पुणे, किशोर- वर्ष ५५, अंक ३ रा, मार्च २०२६ (मासिक) - किंमत रु. ७/- पृष्ठे ५२.
Pune, Kishor- Vol. 55, Issue- 3, March 2026 (Monthly) - Price Rs. 7/- Pages- 52.

# किशोर

मार्च २०२६



# ती जगा उद्धारी

■ किरण डोंगरदिवे

ज्ञानोबाच्या ओवीमध्ये अंकुर फुलवते मुक्ताई
शिवबाच्या स्वप्नांमध्ये चैतन्य रुजवते जिजाई
विठोबाच्या भक्तांमध्ये मेरूमणी ठरते जनाई
भोळ्या शब्दांनी काव्यमळा फुलवते बहिणाई
महदंबेने मराठीतून मांडल्या चक्रधरांच्या लीळा
पूर्णत्वास नेली सावित्रीने ज्योतिबांची शाळा
रमाईच्या त्यागातून बहरला भीमरायाचा मळा
अन् भान हरवून तान लतेची ऐकते ती कोकिळा
झांशीवाल्या त्या मर्दानीचा रणात दौडतो घोडा
चेन्नम्मा अन् दुर्गावतीपाशी इतिहास थांबतो थोडा
पद्मिनीचा जौहर मग डोळ्यांच्या भिजवतो कडा
अन् हिरकणीच्या ममतेचा रायगड गौरवतो धडा
गर्वाने सांगावी सुनीता नि कल्पनाची गगन भरारी
रक्ताच्या थेंबाथेंबांत स्फुरावी तारा झलकारी
नव्या युगाची द्यावी नवी अशी एक ललकारी
जिच्याकडे शिक्षणाची शिदोरी ती जगा उद्धारी

संपर्क : ७५८८५६५५७६



**किशोर** मार्च २०२६, वर्ष ५५ वे, अंक ३ रा, फाल्गुन–चैत्र, शके १९४७

- संपादक :
  अनुराधा ओक, संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे
- प्रकाशक : हेमंत बाबर
  प्र. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई
- निर्मिती अधिकारी : मनिष निघोट
- अक्षरजुळणी : किशोर विभाग
- कार्यकारी संपादक :
  किरण केंद्रे
- वितरण व्यवस्थापक
  जी. आर. पानसरे
- *मुखपृष्ठ : कार्टुनिस्ट इरा*
  *संपर्क : ९४२२३२५८३८*
- *चित्रांकन : गिरीश सहस्रबुद्धे, रेश्मा बर्वे, घनश्याम देशमुख, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, राहुल पोतदार, लोकेश कुलकर्णी, कार्टुनिस्ट इरा, माईंडईट संवाद*

# अंतरंग


- ती जगा उद्धारी ........ *किरण डोंगरदिवे* ........ ०२
- बिट्टी आणि बिट्टू ........ *वृषाली गटणे* ........ ०६
- रंग विक्या........ *स्वाती दाढे*........ ०९
- मैदानावरील खेळ ........ *रजनी हिरळीकर*........ १०
- झुळझुळ झरा ........ *दासू वैद्य* ........ १२
- देवाजीने दिले तुला........ *स्वप्नील चव्हाण*........ १६
- चला चित्र रंगवूया...! ........ *रेश्मा बर्वे* ........ १७
- एका हत्तीची गोष्ट ........ *डॉ नंदू मुलमुले*........ १८
- आज काय झालं ? ........ *कार्टुनिस्ट इरा*........ २१
- पक्षी जाय दिगंतरा........ *डॉ. संगीता बर्वे* ........ २२
- नदीबाई ........ *संतोष आळंजकर*........ २५

**अभिजात मराठी विभाग**
- विंदा आजोबांची कविता!........ *प्रवीण दवणे*........ २६
- शब्दांची गुंफू या माळ........ *डॉ. नीलिमा गुंडी*........ २८
- गंमत शब्दांची........ *प्रा. विश्वास वसेकर*........ ३०
- प्रश्नमंजूषा ........ *डॉ. सुधीर मोरे* ........ ३१

- रानसखा धनेश ........ *माणिक पुरी*........ ३२
- झालाना पॅटर्न ........ *सुधीर साबळे*........ ३५
- कुतूहल. ........ *योगेश दराडे*........ ३८

**बालविभाग**
- भावी आधारस्तंभ ........ ४०
- उमलती प्रतिभा........ ४२
- चित्रकथा : जादूगाराची सुटका........ *घनश्याम देशमुख*........ ४४
- चिमणी........ *विलास मोरे*........ ४६

**ENGLISH SECTION**
- Garden of Life........ ***Roshankumar Pilewan***........ ४७
- Facing Examinations with Confidence........ ***Dr. Sanjay Gaikwad***........ ४८
- Funny Puzzle........ ***Ghanshyam Deshmukh***........ ५०


ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/– मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील (डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे– ४११००४, **संपादकीय** : ०२०– २५७१६१०७ **वितरण व तक्रार** : ०२०–२५७१६२४४
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

# प्रिय किशोर

■ सुनील काजारे

## आमचा 'किशोर' दादा

आमचा 'किशोर' दादा
मला आवडतो खूप
दर महिन्याला येतो
घेऊन आकर्षक रूप


ऊन असो वा पाऊस
ना यास तयाची फिकर
ज्ञानदानासाठी हा
असतो नेहमी तत्पर

कोडी कथा यातल्या
असतात फारच गोड
मनोरंजनाला त्याच्या
नाही कसलीच तोड

आज, उद्या नि परवाही
आवडीने वाचत राहू
सुंदर प्रवासाकरिता तुला
कोटी कोटी शुभेच्छा भाऊ

अंतरंगातील याची
असते मेजवानी छान
तनमन हरवून जाते
वाचताना एकेक पान

संपर्क : ९९७०४७१०२०









हितगुज

# स्वामी विवेकानंदांची एकाग्रता

किशोर मित्र –मैत्रिणींनो, मला तुम्हांला काही विशेष सांगायचे आहे. ‘एकाग्रता’ या विषयाबाबत. स्वामी विवेकानंदांच्या मते, एकाग्रता हा सर्व ज्ञानाचा सार, गाभा आहे. एकाग्रता हा गुण शिक्षणाचा पाया आहे. आपण शिक्षण घेत असताना केवळ माहिती गोळा करणे आणि घोकंपट्टी करण्याऐवजी, शांत आणि एकाग्र मनाने ती व्यवस्थित समजून घेत ग्रहण करणे आवश्यक आहे. आपल्या प्रत्येकाच्या मनाची शक्ती मोठी असून मानवी मनाच्या शक्तीला काही सीमा नाही. मन जितके अधिक एकाग्र होईल, तितकी एखाद्या गोष्टीवर केंद्रित होण्याची त्याची शक्ती वाढेल. स्वामीजी आपली एकाग्रता कशी वाढवायची हे सांगताना मेणबत्तीचे उदाहरण देत असत. ते म्हणत, ‘‘आपले विचार मेणबत्तीच्या ज्योतीसारखे असतात आणि जगातील विचलित करणाऱ्या, अडथळा आणणाऱ्या गोष्टी वाऱ्यासारख्या असतात. जर तुम्ही त्या ज्योतीभोवती एकाग्रतेचे कवच धरले, तर ती विझणार नाही. ती प्रकाशमान होत आपले कार्य अखंडपणे सुरू ठेवेल.’’

स्वामी विवेकानंदांच्या एकाग्रतेबाबत, त्यांच्या आयुष्यातील काही घटना फार प्रेरणादायी आहेत. त्यातून तुम्हांला नक्कीच स्फूर्ती मिळेल. जेव्हा स्वामी विवेकानंद अमेरिकेत होते, तेव्हाची ही गोष्ट आहे. स्वामीजींनी एका नदीच्या पुलावर काही मुलांना पाहिले. ती मुले नदीत तरंगणाऱ्या अंड्याच्या कवचांवर (Eggshells) एअरगनने नेम धरण्याचा प्रयत्न करत होती. अनेक प्रयत्न करूनही त्यांचे नेम चुकत होते. हे पाहून स्वामीजी थोडेसे हसले. त्यांना हसताना पाहून एका मुलाने त्यांना विचारले, ‘‘तुम्ही आमची थट्टा का करत आहात? तुम्हांला तरी हे जमेल का?’’ स्वामीजींनी बंदूक हातात घेतली, काही वेळ लक्ष एकाग्र केले आणि सलग १२ वेळा गोळ्या झाडल्या.आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्यांचे सर्व १२ नेम अचूक लागले. मुलांनी थक्क होऊन विचारले की, त्यांनी हे कसे केले. तेव्हा स्वामीजी म्हणाले ‘‘तुम्ही जे काही करत असाल, त्या वेळी तुमचे संपूर्ण लक्ष केवळ त्या एकाच गोष्टीवर असायला हवे. जर तुम्ही नेम धरत असाल, तर तुमचे मन केवळ लक्ष्यावर असले पाहिजे. हीच एकाग्रतेची शक्ती आहे.’’

स्वामीजींची बेलूर मठात असतानाची एक गोष्टही खूप बोधप्रद आहे. त्या वेळी स्वामीजींनी ‘एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका’चे नवीन १० खंड वाचायला घेतले होते. एका शिष्याने त्यांना विचारले की ‘‘एवढी मोठी पुस्तके वाचून पूर्ण करणे शक्य आहे का?’’ त्यावर स्वामीजी त्याला म्हणाले की, ‘‘त्यांनी पहिले १० खंड पूर्ण वाचले आहेत.’’ त्याला या गोष्टीचे मोठे आश्चर्य वाटले. त्याचा यावर विश्वास बसेना. जेव्हा शिष्याने त्यांची परीक्षा घेण्यासाठी ब्रिटानिकाच्या कोणत्याही खंडातून प्रश्न विचारले, तेव्हा स्वामीजींनी केवळ उत्तरेच दिली नाहीत, तर त्यातील मजकूर देखील म्हणून दाखवला. किशोर मित्र – मैत्रिणींनो, ज्या वेळी तुम्ही एखाद्या गोष्टीत इतके रमून जाता की तुम्हांला स्थळाचे, वेळेचे भान राहत नाही, तेव्हा तुमचे मन एकाग्र झाले असे समजावे. तुमचे मन एकाग्र होणे जसे खेळ, संगीत आणि इतर कलांमध्ये होते तसेच ते अभ्यासाबाबतही होवो.

– किरण केंद्रे
कार्यकारी संपादक



# बिट्टी आणि बिट्टू

वृषाली गटणे



''बिऽऽऽट्टी ऽऽऽ''

''बिऽऽऽट्टूऽऽऽ''

गेली तेवीस मिनिटं बिट्टेश हाका मारत फिरत होता. आज पौर्णिमा असल्याने चंद्र चांगला डोक्यावर आला होता. बिट्टेशच्या अंगावरचे काळे ठिपके त्या उजेडात चमकत होते. वाऱ्याच्या झुळका वाहत होत्या, पण बिट्टेशला मात्र चांगलाच घाम फुटला होता. त्याचे हिरवे डोळे काहीतरी शोधत होते... त्याची दोन पिल्लं!

बिट्टूली आज खूप दिवसांनी नदीपलीकडे शिकारीसाठी जाणार होती. म्हणून तिने बिट्टेशला पिल्लांकडे लक्ष द्यायला बोलावून घेतले होते. सातच महिन्यांची तर होती त्यांची बाळं. चंद्र उगवला आणि बिट्टू लगेच कामाला निघाली. बिट्टेश कपारीजवळच्या झाडावर बसून मुलांकडे लक्ष ठेवून होता. पण येतायेता





झालेल्या भरपेट जेवणामुळे त्याला जरा डोळा लागला आणि तिथेच नेमकी गडबड झाली! लांडग्याच्या ओरडण्याने तो दचकून उठला तेव्हा समोर पिल्लं नव्हती. पिल्लांना हाका मारत त्याने झपाट्याने खाली उडी मारली.

''बिट्टी आणि बिट्टूला शोधतोयस का?'' फांदीवर बसलेल्या म्हाताऱ्या घुबडाने त्याला विचारलं. ''ते दोघं खालच्या तळ्याकडे गेलेत. तहान लागली असावी...''

बिट्टेश वेगाने धावू लागला. काही मिनिटांतच तो तळ्याजवळ पोचला. गवतातल्या सापाने त्याला ओळखलं. ''पिल्लांना शोधतोयस का? त्यांना जुन्या गढीजवळ पाहिलं मी. चांगली मजेत खेळत होती बघ.''

बिट्टेश परत वेगाने धावू लागला. गढीतल्या मधाच्या पोळ्यावर ताव मारून परत येणाऱ्या अस्वलाने त्याला थांबवलं, ''अरे बिट्टेश, तुझे बिट्टी आणि बिट्टू फार बदमाश झाले आहेत बरं का! त्या बिचाऱ्या साळिंदराला उगाचच इकडून तिकडे लोळवत होते... मी थांबवलं तेव्हा ते त्या बाजूला पळून गेले बघ! जा पटकन आणि घरी घेऊन जा यांना.'' अस्वलाने कुरणाकडे हात करत सांगितलं.

कुरणात रानकुत्रे असतात हे बिट्टेशला पक्कं माहीत होतं. त्याचं काळीज धडधडू लागलं. रानकुत्र्यांनी त्याच्या पिल्लांची शिकार केली तर...

आज पहिल्यांदाच बिट्टी आणि बिट्टू ही बिबट्याची जुळी पिल्लं त्यांच्या कपारीतून बाहेर पडली होती. रोज त्यांच्या आईचं दोघांवर अगदी बारीक लक्ष असे.

''बिट्टी, आपण आता अर्ध्या वर्षाहून मोठे झालो ना! तरी आई आपल्याला बाहेर नेत नाही. असं काय गं?'' बिट्टू विचारत असे.

''अरे बिट्टू, अजून आपल्याला शिकार करायला शिकायचंय. आपण आता बाहेर पडलो तर आपणच शिकार होऊ त्या तरस, लांडगे नाहीतर रानकुत्र्यांची!'' बिट्टीने बिट्टूला एक पंजा मारत सांगितलं होतं.

अगदी बरोबर सांगितलं बिट्टीने. म्हणूनच त्यांची आई, बिट्टूली, त्यांना कुठेही जाऊ देत नसे. मात्र छान

छान शिकार आणून त्यांचे लाड मात्र भरपूर करत असे. शिवाय झाडावरचे घुबड आजोबा, वटवाघूळ कुटुंब, एक खारुताई, आणि एक खवल्या मांजर हे त्यांच्या आजूबाजूचे प्राणी-पक्षी त्यांचे दोस्त झाले होते. त्यांच्याकडून ते रहात असलेल्या जंगलाविषयीही त्यांना कायकाय गोष्टी माहीत झाल्या होत्या!

जंगलाचे दोन भाग करणारी नदी, खूप खूप जुन्या काळातली एक गढी, भरपूर जेवण आणि पाणी देणारा तलाव, मोहाच्या झाडांचं बन, एक मोठ्ठं कुरण आणि त्यापलीकडेच असणारं माणसांचं गाव... काय काय ऐकलं होतं त्यांनी.

''ए! पण तुला नाही का पहावंसं वाटत आपलं जंगल?'' बिट्टूने परत एकदा विचारलं.

हे सगळं पाहण्याची उत्सुकता तर बिट्टीलाही लागून राहिली होती. पण त्यांच्या आईला न सांगता कपारीपासून इतकं दूर जाणं कधीच शक्य झालं नसतं. आज मात्र नेमका बाबा लक्ष ठेवायला आल्याने ही चांगली संधी त्यांना मिळाली होती. बिट्टू बिट्टीच्या अगदी मागेच लागला आणि दोघं हळूच सटकले.

कपारीतून बिट्टू बिट्टी खाली आले आणि समोरच त्यांना तळं दिसलं. चांदण्यात चमचमणारं तळं. दोघं पटकन पुढे आले आणि पाण्यात शिरले. पाणी एकदम थंड थंड लागलं त्यांच्या अंगाला. ते थरथरले. बिट्टूचा जरा तोल गेला तर बिट्टीने त्याला सावरलं. असं काय होतंय... त्यांना आधी काही कळेना... पण त्यांचे पाय पाण्यात आपोआप हलू लागले आणि त्यांचं शरीर वर तरंगू लागलं. बिट्टी आणि बिट्टू चक्क पोहत होते. पहिलीच वेळ असल्याने ते पटकन थकले आणि बाहेर आले.

अंग थोडं सुकवलं आणि चक्कर मारत मारत दोघं पुढे गेले. तशी सगळीकडे शांतता होती पण काही विचित्र आवाज मात्र ऐकू येत होते. अचानक गवतात सळसळ झाली. दोन्ही पिल्लं थोडी घाबरली. पण बिट्टी एकदम हुषार! ''बिट्टू, इकडे ये. आपण या बाजूच्या उंच गवतात लपूया.'' रात्रीचा अंधार आणि त्यांचे काळे ठिपके यामुळे ते खरंच गवतात दिसेनासे झाले. थोड्याच वेळात आवाजही थांबला.

परत वाटेवर आले तेव्हा त्यांना त्यांच्यापेक्षा जरासा लहान एक प्राणी दिसला. ते होतं एक साळींदर. बिट्टूने पुढे होऊन त्याच्याशी खेळायला सुरुवात केली. बराच वेळ खेळ सुरू राहिला. पण तेवढ्यात बिट्टीला कुठूनतरी एक मोठं काळं अस्वल येताना दिसलं आणि दोघं पळून गेले.

''अहाहा! किती छान मस्त मोकळी जागा! हेच ते आपल्या जंगलातलं कुरण असणार!'' बिट्टी म्हणाली. हो, दोन्ही पिल्लं कुरणापर्यंत पोचली होती. लहानशा कपारीत राहणाऱ्या त्या पिल्लांच्या डोळ्यांत ते अफाट कुरण मावतही नव्हतं. आणि त्यांना झालेला आनंद त्यांच्या इवल्याशा मनात मावत नव्हता.

ते सुंदर दृश्य मनात भरून घेतानाच अचानक पिल्लांच्या मनाचा थरकाप उडाला. रानकुत्र्यांचा एक कळप कुरणाच्या मध्यभागी उभा होता. समोर असलेल्या मोठ्ठ्या कुत्र्यांचे लाल डोळे चमकत होते. बिट्टू आणि बिट्टीला काय करावे सुचेना. कपारीबाहेर पडून आपण चूकच केली असं त्यांना वाटायला लागलं. रानकुत्रे हळूहळू पुढे सरकत होते. त्यांच्या पिलांसाठी ही छोटीशी मेजवानी त्यांना मिळणार होती ना! घाबरून बिट्टी आणि बिट्टूने डोळे गच्च मिटून घेतले.

आणि त्याच क्षणी, अगदी तेव्हाच, दोघं अचानक हवेत उचलले गेले. प्रचंड वाऱ्याच्या वेगाने ते उडू लागले. बिट्टीने डोळे किलकिले करून वाकून पाहिलं तर काही कुत्रे त्यांच्या मागे येत होते पण हळूहळू त्यांच्यातलं अंतर वाढत गेलं. कुत्र्यांनी पाठलाग सोडून दिला. निश्चिंत होऊन तिने डोळे परत मिटून घेतले. काही वेळातच बिट्टू आणि बिट्टीचे पाय त्यांच्या ओळखीच्या कपारीला लागले. हृदयाची धडधड थांबल्यावर दोघा पिल्लांनी आपल्या मोठ्या हिरव्या डोळ्यांनी वर पाहिलं, तेव्हा त्यांना दिसले त्यांच्याकडेच हसत हसत पाहणारे बिट्टेश आणि बिट्टूली.

**संपर्क : ९५५२००९६००**

# रंग विक्या

■ स्वाती दाढे

रंग घ्या रे रंग
रंगविक्या मी मुक्त विहंग,
रंग घ्या रे रंग ।।

गवतासम हा रंग हिरवा
साज देईल नवानवा
घ्या रंगवुनी अंग-प्रत्यंग,
रंग घ्या रे रंग ।

रंग निळुला आभाळाचा
कागद हा तर चित्रकारीचा
नाचती त्यावरी जल-तरंग
रंग घ्या रे रंग ।

उगवतीचा रंग लाल
होतील लाले ऽऽ लालच गाल
उठा, उठा रे, घ्या सत्संग,
रंग घ्या रे रंग ।



शुचिर्भूत हा रंग शुभ्र
दिसे जसे आभाळ निरभ्र
रंगांचा राजाच निरंग,
रंग घ्या रे रंग ।
रंगांचा पहा खास नजारा
कळ्या-फुलांचा गोड फुलोरा
मनी उमलू द्या शुद्ध उमंग
रंग घ्या रे रंग ।

काळा सावळा रंऽग एक
कृष्ण-विठोबा-राम अनेक
भावभक्तीचे गात अभंग,
रंग घ्या रे रंग ।

सात कमानी इंद्रधनुष्य
रंगीबेरंगी हे आयुष्य
चला, रंगुनी व्हा नि:संग
रंग घ्या रे रंग ।

रंग घ्या हो रंग अनेक
दाम द्या मज हास्य सुरेख
रंगांत रहा रे सदैव दंग
रंग घ्या रे रंग ।

संपर्क : ९७६७०४९९१२

# मैदानावरील खेळ

रजनी हिरळीकर

मैदानावर मुलांचा खेळ रंगला होता. क्रिकेट, फुटबॉल, लाठी फिरवणे इत्यादी शाळा सुरू व्हायला दहा मिनिटांचा वेळ होता. मैदानाच्या चारही बाजूंना शाळेच्या भव्य इमारती. हजारो विद्यार्थी तिथ शिक्षण घ्यायचे. शिक्षक, पालक, कर्मचारी यांची ये जा सुरू होती. खेळणाऱ्या मुलांना कसलेच भान नव्हते. आरडाओरड सुरू होती. आठवीच्या वर्गातील पाच सहा विद्यार्थी लाठी फिरवण्याचा सराव करत होते. अचानक एका मुलाची लाठी दुसऱ्या मुलाच्या डाव्या डोळ्यावर बसली. तो जोरात किंचाळला. जवळपासचे सर्व खेळ थांबले. विद्यार्थी त्या मुलाच्या भोवती जमू लागले. एकच आरडाओरड सुरू झाली. मुलांच्या शाळेच्या प्रवेशद्वाराजवळच ही घटना घडली होती. काही विद्यार्थी धावतच स्टाफरूममध्ये शिरले. धापा टाकत त्यांनी घडला प्रकार सांगितला. सर्व शिक्षक-शिक्षिका आवारात आले. नाईक सर, जाधव सर, जोशी सर यांनी मुलांची गर्दी हटवली. त्यांनी जखमी विद्यार्थ्याला स्टाफरूममध्ये आणले. तो वेदनेने ओरडत होता. ज्याची लाठी त्याला लागली होती तो प्रचंड घाबरला होता. शिपायाने घंटा वाजवली. विद्यार्थी आपआपल्या वर्गात गेले. जखमी विद्यार्थी 'आठवी अ' मधला रोहन होता. ज्याची काठी लागली तो त्याच्याच वर्गातील तुषार होता. एव्हाना एका शिक्षकाने फोन करून दोघांच्या पालकांना शाळेत बोलवून घेतले आणि रोहनला नेत्रतज्ज्ञ डॉ. देसाई यांच्या हॉस्पिटलमध्ये नेले. पालकही त्यांच्या पाठोपाठ गेले.

शाळेच्या मैदानावरील हे नेहमीचेच दृश्य. मुलांना



खेळताना भान राहत नाही. आजूबाजूला लक्ष देण्याची त्यांना गरज वाटत नाही आणि मग लहानमोठे अपघात होत राहतात.

रोहन आणि तुषार एकाच वर्गात शिकणारे... शाळेच्या मैदानावर रोज विविध खेळणारे पण आज अपघात झाला खरा. रोहनच्या डाव्या डोळ्यावर बसलेली लाठी. तितकीच जखम मोठी. डॉ. देसाईंनी त्वरित तपासणी करून उपचार सुरू केले. एक छोटे ऑपरेशन करावं लागणार होतं. नियमानुसार काही रक्कम भरावी लागणार होती. पालक धावत-पळत आल्याने त्यांनी फारशी रक्कम आणली नव्हती.

नाईक सरांनी आपल्या खात्यावरून आवश्यक ती रक्कम ऑनलाईन भरली. पैसे नंतर जमा झाले असते. रोहनचे वडील म्हणाले, ''सर, तुमचे फार उपकार झाले. अशा वेळी मी एकदम एवढी रक्कम भरू शकलो नसतो. पण सर, मी लवकरच तुमचे पैसे देईन. आभारी आहे सर...''

त्यांना धीर देत नाईक सर म्हणाले, ''आभार कसले मानता! शाळा परिसरात खेळताना झालेला हा अपघात. अहो, आमचा मुलगा तसा तुमचा. पैशाचं बघू नंतर. आधी उपचार महत्त्वाचे... रोहनचा डोळा वाचला पाहिजे.''

जोशी सर म्हणाले, ''असे लहान मोठे अपघात शाळेच्या परिसरात सतत होतच असतात. वेळ महत्त्वाची. त्वरित उपचार होणे आवश्यक असते ना!'' देसाई डॉक्टरांनी नेत्रतज्ज्ञ डॉ. श्रीखंडेना बोलून घेतले. डोळ्यांतून खूप रक्तस्राव झाला होता. आता रक्त थांबले होते पण डोळ्याच्या बाहेरचा भाग काळसर झाला होता.

इकडे शाळेत नेहमीप्रमाणे शाळा सुरू होती. 'आठवी अ'चा वर्ग दबलेला होता. रोहनच्या डोळ्यांचं काय होतंय याची काळजी सर्वांनाच वाटत होती. बेभान खेळावर प्रार्थनेच्या वेळी मुख्याध्यापक गोळे सर बोलले होते. त्यांनी समजुतीच्या चार गोष्टी मुलांना सांगितल्या.

रोहनच्या डोळ्यांचे ऑपरेशन झाले. आता तीन दिवस डोळा बंद ठेवायचा होता. दुसऱ्या दिवशी त्याला घरी सोडले. वर्गमित्र त्याला भेटायला गेले. तुषार मनातून फार उदास झाला होता. ''रोहन, माझ्यामुळे हे घडले मला माफ कर. मी मुद्दाम नाही मारली काठी....''

''अरे, तू मुद्दाम का मारशील? आपण सारे खेळत होतो. खेळताना चुकून काठी लागली...वाईट वाटून घेऊ नकोस रोहन. आपण साऱ्यांनीच मैदानावर खेळताना थोडी सावधगिरी बाळगायला हवी. खेळताना भान राहत नाही आपल्याला.....'' मंगेश म्हणाला.

''होय रे! आता आपण असं बोलतोय पण पुन्हा मैदानावर गेलो की हे विसरून जातो... म्हणून तर पुन्हा पुन्हा अपघात होतात.'' नंदू म्हणाला, ''मैदानावरून आपल्या शाळेच्या इमारतीकडे शिक्षक, वाहक, अन्य काही मंडळी येत असतात. कित्येक वेळा आपले बॉल त्यांना लागतात. हे बरं नाही.'' हेमंत म्हणाला, ''खरंतर एक उपाय आहे. आपलं मैदान भरपूर मोठे आहे. शाळेत येण्याजाण्याचा रस्ता आपण मोकळा ठेवला तर बरेच अपघात कमी होतील. शिवाय शाळा सुरू होण्यापूर्वी पंधरा मिनिटे आपण सर्वांनीच खेळ थांबवायला हवेत.'' परेश म्हणाला, ''आपण उद्याच विद्यार्थी प्रतिनिधींची एक बैठक घेऊ आणि यावर चर्चा करून काही नियम ठरवता येतात का पाहू!'' शेखर म्हणाला.

आतापर्यंत मुलांचं बोलणं ऐकणाऱ्या रोहनच्या वडलांना मुलांचं कौतुक वाटलं. एवढा विचार मुलं करू शकतात. हेच किती छान होतं. ते म्हणाले,''वा! छान. चांगले आहेत तुमचे विचार. अपघात टाळायचे तर विचारपूर्वक वागा. सर्व जण तुमचे कौतुक करतील आणि हो, आता सर्वांनी रोहनच्या आईनं केलेला खाऊ खाऊन जायचं आहे हं!''

मुलांनी मजेत खाऊ खाल्ला आणि रोहनचा निरोप घेऊन सर्व जण आपापल्या घरी निघाले.

**संपर्क : ७०२०३३९५६६**


बालकादंबरी

भाग ३

दासू वैद्य

# झुळझुळ झरा

देसाई गल्ली ओलांडली की उंच टेमकाड लागायचं. या टेमकाडावरून लांबवरची शाळा, आणि शाळेमागे पसरलेले शेतमळे चित्रातल्यासारखे दिसायचे. टेमकाड उतरून खाली आलं की, फुलमळ्याचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांची घरं होती. इथं गाव संपायचं आणि पुढं शेतमळे सुरू होत. या शेतातून शाळेत जायला चिंचोळी वाट होती. मका, ज्वारी, कापूस असं काय काय दुतर्फा वाढलेलं असे. या वाटेवरून जाताना मज्जा यायची. घरापासून शाळेत जायला साधारणपणे अर्धा तास लागे. आम्हाला मात्र रमतगमत शाळेत पोहचायला खूप वेळ लागायचा. कारण शाळेच्या या वाटेवर मोहात पाडणाऱ्या अनेक गोष्टी होत्या. म्हणजे शाळेबाहेरची भारी शाळाच होती. त्यात वाटेतल्या झऱ्यावर तर हमखास थांबायचो. लोंबकळणाऱ्या वडाच्या पारंब्या, पक्ष्यांचा किलबिलाट, आईने ओसरीवर मऊ गोधडी अंथरल्यासारखी झाडाखाली अंथरलेली दाट सावली, झाडाखालच्या वाळक्या पानांचा होणारा आवाज. यामुळे तिथलं वातावरण गूढ वाटायचं. झाडाखाली जुनाट चिरेबंदी ओटा होता. त्या ओट्यावर खूप जुना महादेव. पण त्या महादेवाचा पितळेचा मुखवटाच गायब होता. या चोरट्यांमुळे देवही संकटात आलाय अशी म्हातारी माणसं गावात चर्चा करायचे. कारण काहीही असेल पण चोर पिंपळाखाली फारसं कुणी जात मात्र नसे. एकदा रतनू, सुऱ्या, सुभ्या, गणू,चेतन असं आमचं साहसी मंडळ कुतूहल म्हणून चोर पिंपळाखाली गेलं होतं. पारंब्यांना लोंबकळून खूप मस्ती केल्यानंतर तिथल्या ओट्यावरच्या सावलीत आम्ही थकून चक्क लोळत होतो. तेवढ्यात नेमका रतनुच्या अंगावर पक्षी शिटला. रतनू रागावला. आमच्या हसण्यामुळे रतनू अधिकच भडकला. रागात त्याने पक्ष्यांना दगड मारले. पक्षी उडून गेले. त्यातला



# लाडेलप्पा



एक दगड मधमाश्यांच्या पोळ्याला लागला आणि मधमाश्या उठल्या. मधमाश्या चावण्याच्या भीतीने आम्ही पळत सुटलो. माश्या मागे लागल्या. प्रत्येकाला माशी चावली. चावली म्हणजे काय बारीक काटा घुसवला. प्रचंड आग. अगं आई गं.. रतनुला तर बऱ्याच माश्या चावल्या. घरी जाण्याची हिंमत नव्हती. कारण शाळा बुडवून आम्ही चोरपिंपळ गाठलेला होता. मग रतनच्या डोक्यात एक आयडिया आली. आम्ही वेशीवरच्या मारुतीच्या देवळात गेलो. तिथल्या दिव्यातलं काळपट तेल मधमाशी चावलेल्या जागेवर लावलं. होणारी आग सहन केली. तरीही हे प्रकरण दुसरे दिवशी उघड झालंच. मधमाशी चावलेली जागा टम्म सुजली होती. रतनू तर जागोजागी सुजला होता. ''ती चोरपिंपळाची जागा चांगली नाही रे पोरांनो. तिकडं कशाला गेलात?'' असं सगळ्यांच बोलणं ऐकून घ्यावं लागलं. चोरपिंपळ शाळेच्या वाटेपासून थोडा आत होता.

झुळझुळ झरा मात्र शाळेच्या वाटेवरच होता. झरा ओलांडूनच आम्हांला शाळेत जावं लागायचं. खंडोबाच्या माळावरून आलेला हा ओहोळ सीता नदीला जाऊन मिळत असे. वर्षातले आठ-नऊ, महिने छोटीसी धार उताराला पळत असे. जसजसे झऱ्याच्या जवळ जाऊ तसतसा झऱ्याचा झुळझुळ आवाज ठळक व्हायचा. एकदा संध्याकाळी शाळेच्या मैदानावर खेळताना उशीर झाला. अंधारून येत होतं. लगबगीने घरी निघालो. त्या शांत वातावरणात झऱ्याचा झुळझुळ आवाज कितीतरी मोठा वाटत होता. या झुळझुळ आवाजामुळेच 'झुळझुळ झरा' असे आम्ही त्याचं नाव ठेवलं होतं. वाटेवर झरा ओलांडण्यासाठी मोठ्ठा सिमेंटचा पाईप आडवा टाकलेला होता. पाईपच्या वरतून आम्ही चालत असू आणि पाईपातून झरा बिनबोभाट वाहत असे. लांबून येणारा झरा पाईपातून जाताना निमुळता होई. एखाद्या बांगडीतून भली लांब साडी काढल्यासारखे वाटायचे. या झुळझुळ झऱ्यामुळे शाळेला हमखास उशीर व्हायचा. शाळेत जाताना सिमेंटच्या पाईपावर आपोआप पाय थबकायचे. कधी विचित्र रंगाचा बेडूक दिसायचा, कधी लगबगीने चालणारा खेकडा दिसायचा, कधी तर एखादा सळसळणारा साप दिसे. गोगलगायीही खूप होत्या. आपल्या मागे चंदेरी वाट सोडणाऱ्या लांब काळपट गोगलगायी तर वर रस्त्यावर येत. काहीच दिसलं नाही तर पाण्यात चिंगळे मासे आणि पाण्यावर रंगीबेरंगी फुलपाखरं हमखास भिरभिरत असायचे. असं काही बघत बसल्यामुळे शाळेला उशीर व्हायचा. शाळेत जाणारे-येणारे सर, इतर मुलं दिसायचे म्हणून वाटेपासून लांब जाऊन आम्ही झऱ्यावर खेळायचो. वेळ कसा निघून जायचा ते कळायचेच नाही.

एके दिवशी नेहमीप्रमाणे शाळेत जाताना रतनू, गणू, सुऱ्या, सुभ्या, चेतन व मी सिमेंट पाईपवर थबकलो. खाली पाण्यातून एक वाळकं पान वाहत जात होतं. त्या पानावर एक लाल मुंगळा नावेत बसल्यारखा बसला होता. त्या मुंगळ्याची सवारी घेऊन नाव पुढं जात होती. ही गंमत पाहताच आम्ही तिघांनी पाईपवरून खाली उड्या मारल्या. पानाच्या मागे काठाकाठाने जाऊ लागलो. लाल मुंगळा ऐटीत बसलेलाच होता. आम्हांला कळेचना ही गंमत कोणी केली असेल? का खरंच मुंगळा लांब कुठे जाण्यासाठी पानाच्या नावेत बसला होता? या मुंगळ्याला ही आयडिया कशी सुचली असणार? पानाबरोबर काठाकाठाने आम्ही पुढे पुढे जात होतो. बरंच लांब आल्यावर झऱ्याच्या मधोमध ठोंब्यासारख्या उभ्या दगडाला ही पानाची नाव धडकली. हेलकावे खावून बुडाली. मुंगळा दिसेनासा झाला. तेव्हा आम्ही भानावर आलो. हातात शाळेचं दप्तर तसंच होतं. बरंच लांऽऽब आलो होतो. इथं झऱ्याचं रूप जरा वेगळंच होतं. झरा जरा पसरलेला होता. शिवाय पाणीही चांगलं गुडघ्याएवढं होतं. इथं गायी-म्हशी पाणी प्यायला येत असाव्यात. काठाच्या चिखलात जनावरांच्या खुरांचे खोल खड्डे होते. झऱ्याच्या पलीकडच्या बाजूला गवत वाढलं होतं. पाणी जरा गढूळ होतं पण चिंगळे मासे

होतेच. पाण्यावर चालणारे केसासारख्या पायाचे किडेही दिसत होते. रंगीबेरंगी फुलपाखरं भिरभिरत होतीच. तेवढ्यात रतनला दगडाखाली लपलेला एक खेकडा दिसला. गोलकिपर फुटबॉलवर झडप घालतो तसा रतनू खेकडा दिसला की त्याच्या मागे लागतो. रतनू हातात काडी घेऊन खेकड्याला बाहेर काढत होता. तसा खेकडा तरातरा चालत बिळात घुसला. आम्ही खेकड्याच्या मागे लागलो. खरे तर रतनुलाच खेकडा पकडता येत होता. आम्ही आपले त्याच्या सोबत राहयचो. चांगलं गुडघाभर पाणी, त्यात चालताना चबक-ढबक वाजत होतं. आम्हांलाही मजा येत होती. मग आम्ही एकमेकाच्या अंगावर पाणी उडवलं. सुऱ्या घसरड्या दगडावरून पाय घसरून पडला. मला हसू आवरेना. तेवढ्यात बिळातला खेकडा पकडू पाहणारा रतनू जोरात ओरडला. शांतता पसरली. आम्हांला वाटलं खेकड्यानं नांगीनं रतनुचं बोट धरलं असावं. पण खेकडा तर बिळातच होता. पाण्यात उभ्या असलेल्या रतनूने डावा पाय गच्च धरून ठेवला होता. त्याच्या पायाला काहीतरी झालं होतं. पायाला काहीतरी लागलं असावं. तो मध्येच पाय झटकत होता. रतनू घाईने पाण्याच्या बाहेर आला. काठावरच्या दगडावर बसला. पाय झटकणं सुरूच होतं. आम्ही त्याचा पाय नीट बघू लागलो. डाव्या पायाला घोट्या जवळ काहीतरी काळपट चिकटलेलं होतं. लगीन घरी भिंतीवर काढलेल्या गणपतीच्या बेंबीला काळा गूळ चिकटवून त्यावर सुपारी लावायचे तसं काहीतरी दिसत होतं. साधारणपणे छोट्या बदामाच्या गोडंबीसारखा आकार होता. रतनू तसा धीट पण त्याच्या चेहऱ्यावर होणारा त्रास स्पष्ट दिसत होता. हिंमत करून त्या चिकटलेल्या काळपट बदामाला मी हात लावून पाहिला. तर चांगलं मऊ मऊ लागत होतं. त्याचे हात-पाय-तोंड काहीच दिसत नव्हतं. पाहता पाहता फोडासारखं ते फुगायला लागलं. तेव्हा रतनुच्या लक्षात आलं की हा काळपट बदाम आपले



रक्त पितोय. बाप रे..आम्ही घाबरलो. रतनू पाय धरून बसला होता. होणारा त्रास सोसत होता. एक प्रयत्न म्हणून मी आणि सुऱ्या पाण्याचे सपकारे काळपट बदामावर मारू लागलो. पण काही परिणाम नाही. काळपट बदामाने प्यालेलं रक्त आता त्याच्या फुगलेल्या शरीरातून जाणवू लागलं. सुऱ्या म्हणाला, ''असंच आपण घरी जाऊया. नाही तर हा काळपट बदाम रतनूचे संपूर्ण रक्त पिवून टाकायचा'' सुऱ्याचा विचार चांगला होता पण, ''शाळा सोडून झऱ्यावर काय करीत होतात?'' या प्रश्नाला सामोरं जाणं अवघड होतं. या प्रश्नातून निर्माण होणारे अनेक प्रश्न टाळण्यासाठी घरी जाण्याचा बेत रद्द झाला. मग करायचं काय? दोन्ही बदाम रक्त पिऊन टम्म झाले होते.

चेतनने बाभळीचा काटा उचलला आणि एका बदामाला टोचवला तर त्यातून लाल रक्त आलं. ते रक्त रतनूचच असणार. रक्त बघून आम्ही अधिकच घाबरलो. रतनूला अधिकच त्रास झाला. सुऱ्याने पंक्चर झालेला बदाम चिमटीत धरून ओढला. तुटून काही भाग रतनूच्या कातडीला चिकटून राहिला. तेवढ्यात झऱ्याच्या वरच्या बाजूला म्हशींच्या गळ्यातल्या घंटा वाजू लागल्या. सोबत म्हशी चारणारे गुराखी मामा दिसत होते. आम्हांला खूप आधार वाटला. मी आणि सुऱ्या त्यांच्याकडे पळतच गेलो. त्यांच्या झुपकेदार मिशा भारीच होत्या. त्यांना आम्ही सर्व प्रकार सांगितला. आमचे शांतपणे ऐकून मामा मिशीत हसले ''तुम्ही चवमुखी गणपतीजवळचे पोरं हाव ना रं?'' आम्ही पटापट आमची ओळख सांगितली. पायातला कातडी जोडा करकर वाजवत मामा आमच्या सोबत आले. रतनू बिचारा पाय धरून बसलेला होता. मामांनी हातातली काठी बाजूला ठेवली. रतनूचा पाय नीट बघितला. मामांना हा सर्व प्रकार लक्षात आला. आपलं रक्त मध्येच ओढलं जातंय असं रतनूला जाणवत होतं. एक बदाम फुटल्यामुळं पायाला रक्त लागलेलं होतं. दुसरा बदाम मात्र टम्मच होता. रक्त पिणारा ढेकूण आम्हांला माहीत होता पण हा प्रकार प्रथमच पाहत होतो. मामांनी चक्क स्वतःच्या तोंडातली थुंकी हातावर घेतली. आम्ही फक्त बघत होतो. ती थुंकी रतनूच्या पायावरच्या टम्म काळपट बदामावर नीट चोळली. काय आश्चर्य काळपट बदामाची पकड सैल झाली आणि त्याने कातडीही सोडून दिली. एखादी जादू बघावी तसे आम्ही पाहत होतो. मनातून घाबरलेला रतनू एकदम मोकळा झाला. म्हणी आजीच्या भाषेत 'काखेत कळसा अन् गावाला वळसा' असंच झालं . न राहवून मी मामांना विचारलं, ''मामा, हे रक्त पिणारं काय आहे?'' धुतलेला हात धोतराला पुसत मामा म्हणाले, ''पोरानु, या जळवा हायीत. याला जळू म्हणत्यात. गायी, म्हशी, शेरडाला तसं माणसालाबी हे धरतं. रगत पियाला लागतं. त्याचं पोट टम्म भरल्याबिगर ते सोडीतच न्हाई. त्याला वढलं तर तुटून येतं पण पकड ढिल्ली न्हाई करणार.''

सुऱ्याला शंका आली,

''मामा, हे जळू विषारी असतं का?''

मामा मिशीत हसून बोलले ''अरं न्हाई न्हाई. हे ढेकणासारखं चावतं. रगत पितं. पण विषारी-बिषारी न्हाई.'' म्हशी पांगल्या होत्या. ''हाईक हाईक'' करीत काठी घेऊन मामा म्हशीमागे पळाले. एवढ्या मोठ्या संकटातून वाचवणारे मामा आम्हांला आवडले होते. शिवाय मामांनी ''पोरायनू , शाळा सोडून हिकडं काय करताव?'' असंही विचारलं नव्हतं. संध्याकाळ व्हायला आली होती. दगडावर ठेवलेली दप्तरं उचलून आम्ही घराकडे निघालो.

खूपच उशीर झाला होता. घरी गेल्यावर आईने चांगला समाचार घेतला. ''कानकापल्या कुत्र्यासारखा फिरतोस'' म्हणून बाबांनी एक फटका दिला. तरीही झुळझुळ झऱ्याचा नाद कानात होताच. नेहमीप्रमाणे म्हणीआजीच्या खोलीत गेलो. मला पाहून हातातलं पुस्तक तिने बाजूला ठेवलं. ''काय कुटाणे केलेस रे लाडू'' म्हणत जवळ घेतलं. नेहमीप्रमाणे तिला सगळं सगळं सांगून टाकलं. माझ्या डोक्यातून हात फिरवत ती पुटपुटली, ''तुका म्हणे झरा, आहे मुळिचाच खरा'' मला ''तुका म्हणे' सोडलं तर बाकीकाहीच कळलं नाही. तिला विचारावं म्हणलं तर आईचा आवाज आलाच, ''चल रे पानं वाढलीयत. का झऱ्याचं पाणी पिऊनच पोट भरलंय'' मी गुपचूप उठलो. पानावर जाऊन बसलो. खूप खूप खूप... खूपच भूक लागली होती.

**(क्रमशः)**

**संपर्क : ९४०३५८४१११**

■ स्वप्नील चव्हाण

# देवाजीने दिले तुला

देवाजीने दिले तुला
मोतियांचे डोळे
भिरभिर बघून घे बाळा
आकाशाचे सोहळे

चांदण्यांच्या पणत्या बघ
कशा मंद मंद तेवतात
तेल भिजल्या वाती त्यांच्यात
कोणते अदृश्य हात ठेवतात?

ढग बघ कसे वाऱ्यावर
हलके हलके तरंगत जातात
पोटामधला मऊ मऊ कापूस
ते कोणाला बरे नेऊन देतात?

पाखरं बघ ना पंखांवरती
आकाश घेऊन उडतात
लयवेल्हाळ भुरकट चिमण्या
चिवचिव गाणं कुणासाठी गातात?

चांदोबा बघ ना कसा
दिवसांगणिक वाढत जातो
एवढ्या दूर त्याला खुराक
कोण बरे नेऊन देतो?

इंद्रधनुष्याची कमान बघ
कशी सात रंगांनी खुलते
सात रंगांच्या सात सुरांनी
कोणतं अबोलगाणं ती गाते?

गाणं अद्भुत ते ऐकताना
जीवाचे तुझ्या होवोत कान
पक्ष्यांसोबत घेशील पहिली लकेर
तेव्हा नुरो तुला कशाचेही भान!

आकाशाच्या सरोवरात
डुंबून घे रे माझ्या बाळा
तुझ्या पायात रुपेरी
चांदणखड्यांचा घुंगुरवाळा

देवाजीने दिलेत तुला
फुलपाखराचे डोळे
भिरभिर बघून घे बाळा
आकाशाचे खांब निळे

संपर्क : ८४८४९२७०७२



## चला चित्र रंगवूया...!

रेश्मा बर्वे

**वसंतोत्सव येतो... जादूगार यक्ष गर्द वनात उतरून येतात आणि रंगपंचमी खेळू लागतात. नानाविध रंगांची उधळण करतात. चित्र पूर्ण करा आणि सुंदर रंगात रंगवा.**



# एका हत्तीची गोष्ट



डॉ नंदू मुलमुले

दहावीत शिकणारा विनू नेहमीप्रमाणे सकाळी उठला, मात्र त्याला शाळेत जावंसं वाटेना. ''राहू दे आजच्या दिवस, मी सांगेन बाबांना,'' आईने समजावलं. मात्र पूर्ण दिवस त्याचा मलूल चेहरा पाहून त्याला काहीतरी होतंय हे तिच्या लक्षात आलं.

''उदास वाटतंय आई, काहीच करावं वाटत नाही. भूकही लागत नाही. कशात मन लागत नाही,'' पोराचं बोलणं ऐकून आईला कसंसंच झालं.

''नुसते बहाणे करतो, अभ्यास झाला नसेल,'' ताईने टोमणा मारला. मग बाबा मध्ये पडले, ''विनू कधीच शाळा चुकवत नाही. काय झालं बेटा?'' बाबांनी जवळ घेऊन विचारल्यावर विनूला रडूच फुटलं. बाबांनी पाहिलं, पोराला ताप नाही, खोकला नाही, तो फक्त उदास झालाय. त्याचं कारण शोधलं पाहिजे.

''शाळेत काही झालं का बेटा?''

''बाबा, काल परीक्षेचे मार्क मिळाले, मला खूप प्रयत्न करूनही गणितात कमीच पडले. नेहमी दुसरी येणारी नीता पहिली आली. मला काहीच जमत नाही असं वाटायला लागलं. मी पास तरी होईन का हो?'' विनूचा चेहरा असहाय दिसू लागला.

बाबा म्हणाले, ''तुझ्या उदासीनतेचे कारण मी तुला आज दाखवतो. चला आज आपण सारे सर्कस बघायला जाऊ!'' आता सर्कशीचा आणि विनूच्या मनाचा काय संबंध? कुणाला काही कळेना.

''बाबा, तिथे एखादे उदास माकड दाखवणार का तुम्ही?' ताईने असं म्हणताच सारे हसू लागले. विनूलाही गंमत वाटली. पण तो हसला नाही.

सर्कशीच्या तंबूबाहेर एक हत्ती बांधलेला होता. ''तो हत्ती पाहिला? त्याला बांधून ठेवणारी साखळी



पाहिली? काय दिसतंय तुला विनू?''

''बाबा, हत्ती एवढा मोठ्ठा प्राणी, त्याला एवढ्या छोट्या साखळीने बांधून ठेवलंय,'' खरंच, साऱ्यांना आश्चर्य वाटलं. आजवर कुणाच्या लक्षात हे आलं नव्हतं.

''हत्तीचं वजन किती? पाच टन. त्याच्या छोट्या छोट्या डोळ्यांत काय भाव दिसतात?''

''मला तोही उदासच दिसतो. असहाय..'' विनू बोलला. ''तुला सगळे तुझ्यासारखेच दिसतात का रे?'' ताईने चिडवलं. पण आई म्हणाली, ''खरंच, एवढा मोठा प्राणी, एक हिसका देऊन साखळी तोडू शकतो. पण असहाय असल्यासारखा दिसतो.''

''अगदी बरोबर. माणसं हत्तीला कसं पकडतात? प्रथम ते हत्तीच्या पिल्लाला सापळ्यात धरतात. मग त्याचा पाय एका खुंटाला साखळीने बांधतात. तो सुटायचा प्रयत्न करतो, हिसके देऊन पाहतो, पण त्याला जमत नाही. हळूहळू तो प्रयत्न करणं सोडून देतो. आता हत्ती मोठा होऊ लागतो. त्याला माणूस चारा घालतो, पाणी देतो, त्याचं वजन पाच ते सात टन एवढं होऊन जातं. पण माणूस त्याची साखळी बदलत नाही. का?''

''का? खरं तर ती लहानशी साखळी तो कधीच तोडू शकतो.'' साऱ्यांना आश्चर्य वाटलं. विनू कुतूहलाने पाहू लागला. ''हत्ती शरीराने वाढलाय, पण त्याचं मन अजून, त्याला जाळ्यात पकडलं तिथेच आहे. त्याला अजून वाटतं की, तो ही साखळी तोडू शकत नाही.''

''पण बाबा, तो प्रयत्न तर करू शकतो नं? मग त्याच्या लक्षात येईल नं?'' विनूला समजेना.

''बरोबर. पण त्याने प्रयत्न करणंही सोडून दिलंय. आपण साखळी तोडू शकत नाही हेच त्याच्या मनात पक्कं बसलंय. तो असहाय मन:स्थितीत फसलाय.''

विनू विचार करू लागला. बाबांनी त्याच्या




चेहऱ्यावरचे भाव टिपले.

''आता तुझ्या लक्षात आलं असेल विनू की, एकदा आपण म्हणू लागलो की, मला जमत नाही, मी अपयशी आहे, मला कधीच चांगले मार्क मिळणार नाही, की असहायता एक साखळी होऊन पायात पडते. माणूस प्रयत्न करणं सोडून देतो!'' ''मग विनूनं काय करायला हवं?'' ताईला कुतूहल वाटू लागलं.

''तीन शब्द टाळायचे; नेहमी, मीच, कायम. मनाला सांगायचं, मला फक्त या वेळी गणित जमलं नाही, फक्त गणित जमलं नाही, फक्त मीच नाही तर अनेक मित्रांना कमी मार्क मिळालेत, आणि नाही या वेळी तर; पुढल्या वेळी जमेल. मी चांगलाच आहे, पुन्हा प्रयत्न करेन. असहाय वाटून घेणार नाही. शरीराने माणूस रहा, मनाने हत्ती व्हा! मग मनाची ताकत किती होईल?''

''पाच टन!'' विनूच्या चेहऱ्यावरचे असहायपणाचे भाव हवेत विरून गेले. तो पुन्हा पहिल्यासारखा आनंदी दिसू लागला.


**संपर्क : ९४२२८७३३०३**

# इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीची' मराठी व इंग्रजी माध्यमातील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण प्रात्यक्षिक कार्य नोंदवही



राज्यातील इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञ शिक्षकांच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या विविध विषयांच्या उपयुक्त प्रात्यक्षिक नोंदवह्या. दैनंदिन तसेच स्वयंअभ्यासाकरिता तसेच उजळणीकरिता उपयुक्त.




**नोंदणीकृत विक्रेते व शैक्षणिक संस्थांना १५% सवलत**

**वरील प्रात्यक्षिक कार्य नोंदवही खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा**

विभागीय भांडारे

पुणे–९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)– ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर– ९४२३००५०७३, नागपूर– ९४२३००५०७२, नाशिक–९४२३००५०७४, लातूर– ९४२३००५०७५, कोल्हापूर– ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल– ९४२३००५०७८

# आज काय झालं ?



कार्टुनिस्ट इरा
संपर्क: ९४२२३२५८३८

शेजारच्या काकू गावाला जाण्याआधी कुहू-नील यांना "माझ्या झाडांची काळजी घ्या, बरं का!" असा निरोप देतात. आणि मग काय घडतं ते पहा ...




बालदोस्तांनो, तुमच्याबाबतीत पण असं कधी घडलंय का? तुमची झालेली फजिती नक्की लिहून पाठवा :)

बालभारतीच्या कविता

डॉ. संगीता बर्वे

भाग ३

# पक्षी जाय दिगंतरा

संत जनाबाई



पक्षी जाय दिगंतरा । बाळकासी आणी चारा ॥१॥
घार हिंडते आकाशी । झाप घाली पिल्लापाशी ॥२॥
माता गुंतली कामासी । चित्त तिचे बाळापाशी ॥३॥
वानर हिंडे झाडावरी। पिली बांधुनिया उदरी ॥४॥
तैसी आम्हांसी विठ्ठल माये। जनी वेळोवेळां पाहे ॥५॥

हा अभंग हा संत जनाबाईंचा आहे. संत जनाबाई म्हणजे वारकरी पंथाचे प्रवर्तक संत नामदेव यांच्या शिष्या.

'पक्षी जाय दिगंतरा' या अभंगामध्ये जनाबाईने माऊलीच्या रूपात विठ्ठलाचे स्वरूप पाहिले आहे.

आई जशी आपल्या बाळाचा सांभाळ करते तशी विठ्ठल माय आम्हांला सांभाळते हे सांगताना जनाबाईने काही उदाहरणे दिली आहेत. ती म्हणते, आपल्या पिलांना चारा भरवण्यासाठी, खाद्य आणावे म्हणून पक्षी दाही दिशांना फिरतात.

घार आकाशात हिंडत असते. परंतु पिलांच्या काळजीने ती पुन्हा पुन्हा आपल्या घरट्याकडे झेप घेते.

आई कामात गुंतली असली तरी तिच्या मनात आपल्या बाळाचेच विचार येतात. तिला सतत बाळाची काळजी असते. वानरीच्या पोटाला पिलू बिलगलेले असते. या झाडावरून त्या झाडावर उड्या मारताना पिलाला काही दुखापत होऊ नये म्हणून ती काळजी घेत असते.

आपल्या बाळावर आई किती प्रेम करते, त्याची किती काळजी घेत असते हे या उदाहरणांमधून जनाबाईने सांगितले आहे. अशाच प्रकारे आमची विठ्ठल माय आमचा प्रेमाने सांभाळ करते, सतत आमची देखभाल करते असे जनाबाईंनी म्हटले आहे.

आपण कुठेतरी बाहेर खेळायला जातो किंवा मित्र-मैत्रिणींकडे जातो आणि तिथेच रमून जातो, वेळ कसा जातो ते कळतही नाही मग घरी यायला उशीर होतो. आपली आई आपली वाट बघत असते. आपलं मूल कुठं गेलं असेल. अजून लवकर का आलं नाही याची तिला काळजी वाटत असते. कधी कधी असंही होतं की, आई कामासाठी बाहेर जाते आणि तिला घरी यायला उशीर होतो. अशा वेळी आपण तिची वाट बघत असतो. आपण तिला मोबाईलवर कॉल करतो. ती तो कॉल उचलत नाही मग अजून ही का आली नाही याची आपल्याला काळजी वाटायला लागते.

अशाच प्रकारे भक्ताला देवाची आणि देवाला भक्ताची काळजी वाटत असते.

संतसज्जन हे विठ्ठलालाच आपली माऊली समजतात आणि आपण त्याचे मूल आहोत असे समजून त्याच्याशी वागत, बोलत असतात.

संत जनाबाई देखील विठ्ठलाला आपली आई समजते. आई जशी आपल्या मुलाची काळजी घेते तशीच विठूमाऊली देखील आपली

काळजी घेते असं जनाबाईला वाटतं.

जनाबाई या अभंगात म्हणते,

घार आकाशात उडाली तरी तिचं लक्ष आपल्या पिल्लापाशी असतं तसंच विठू माऊलीच लक्ष माझ्यावर कायम असतं. आणि माझंही विठू माऊलीवर लक्ष असतं.

अशा आशयाचा हा जनाबाईचा सुंदर अभंग आहे.

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील गंगाखेड या गावात जनाबाईंचा जन्म झाला.

आईचे निधन लवकर झाल्यामुळे छोट्या जनाबाईला वडलांनी पंढरपूरच्या दामाशेटींच्या घरी ठेवले. तिथे जनाबाई पडेल ती कामं करू लागली.

काम करता करता सतत विठ्ठलाचे नामस्मरण करू लागली. नामभक्तीत ती इतकी रंगून जाऊ लागली की हातातले काम विठ्ठलच करतो आहे असं तिला वाटू लागलं

*'दळीता कांडीता गुण गाईन अनंता...'*

असे अभंग जनाबाई रचू लागली.

संत नामदेव अभंग रचना करत असत. तीच गोडी जनाबाईलाही लागली. अशा भावभक्तीतून–

*घार हिंडते आकाशी*
*लक्ष तिथे पिलापाशी*

या अभंगाचा जन्म झाला.

विठ्ठल आणि आई यांच्या साम्य दाखवणारी संत जनाबाई, विठ्ठल भक्तीत किती रंगून गेली होती याचेच प्रत्यंतर या अभंगातून येते.

**संपर्क : ९४४५९९५६९३**


**प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट**
**अधिनियम – ११ बी**
**अन्वये प्रसिद्ध करायची माहिती**
**फॉर्म क्र. ४ (नियम– ८ पहा )**

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४. |
| **प्रसिद्धीचा नियतकाल** | : | दरमहा |
| **मुद्रकाचे व प्रकाशकाचे नाव** | : | श्री. हेमंत बाबर |
| **राष्ट्रीयत्व व पत्ता** | : | भारतीय महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर, पु.ल. देशपांडे कला अकादमी, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. |
| **संपादकाचे नाव** | : | अनुराधा ओक |
| **राष्ट्रीयत्व व पत्ता** | : | भारतीय महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४. |
| **मासिकाची मालकी** | : | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. |

मी हेमंत बाबर जाहीर करतो, की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

**१ मार्च २०२६** **हेमंत बाबर**
मुंबई – ४०० ०२५. प्रकाशक

# नदीबाई

■ संतोष आळंजकर

नदीबाई नदीबाई
घर तुझे कुठे?
डोंगरात पाखरांची
किलबिल तिथे...

नदीबाई नदीबाई
पाणी तुझे कसे?
आभाळाचे निळेनिळे
डोळे आहेत तसे...

नदीबाई नदीबाई
चाल तुझी कशी?
नागमोडी वळणाची
वाट आहे जशी...

नदीबाई नदीबाई
चाललीस कुठे?
तहानेल्या पाखरांचा
गाव आहे तिथे.


संपर्क : ९४२३७२४४५०

मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा प्राप्त झाला आणि सगळ्या मराठी भाषिकांची मान अभिमानाने उंचावली. हजारो वर्षांची परंपरा लाभलेली आपली मराठी ही जगातील एक महत्त्वाची भाषा आहे. मराठी भाषेच्या या वारशांचा सन्मान करणे आणि पुढील पिढ्यांकडे तो अधिक समृद्ध रूपात सुपूर्द करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठी अभिजात भाषा झाली आता तिची वाटचाल ज्ञानभाषेकडे होणे आवश्यक आहे. या प्रयत्नात खारीचा वाटा म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी 'बालभारती' आणि महाराष्ट्र शासनाचा 'मराठी भाषा विभाग' मिळून 'अभिजात मराठी' हा उपक्रम राबवत आहोत. या विविध सदरांच्या माध्यमातून दरमहा सहा पाने मराठी भाषेच्या गौरवासाठी राखीव ठेवण्यात येत आहेत. आपण सारे मिळून मराठी भाषेचे जतन व संवर्धन करूया.

# विंदा आजोबांची कविता!

प्रवीण दवणे

*शब्द नि त्या सोबतीने कल्पनेचे पंख देणारी अलिबाबाची गुहा आपल्यासाठी उघडली आहे आपल्या मराठी भाषेने. कथा, कविता, ललित लेख, अशा असंख्य रत्नमाणकांनी संपन्न असलेली आपली अभिजात मराठी आपल्या थोर साहित्यिकांनी समृद्ध केली आहे.*



आजोबांचा खाऊ जसा एक वेगळाच गोडवा घेऊन येतो, तशीच आपल्या लाडक्या विंदा आजोबांनी, म्हणजेच कविवर्य विंदा करंदीकर यांनी आपल्याला कवितेतून जी बौद्धिक आणि तरीही रंजक, कधीही न संपणारी रुचकर शिदोरी दिली आहे, त्याबद्दल मी येथे बोलणार आहे. अर्थात त्यांच्या काही मजेशीर कवितांची सोबत संगत घेऊन.

त्यांच्या कवितांचा 'अजबखाना' इतका धमाल आहे की त्यातून बाहेर यावे असे वाटतच नाही.

त्यात अतिशयोक्तीची मजा आहे, मजेशीर कृतींची नाट्यमयता आहे, नि डोळ्यांपुढे प्रसंग घडत आहे, असे वाटणारी चित्रमयताही आहे.

'भीमाचे जेवण' या कवितेतील काही ओळी पहा

*बकासुर ओरडला,*
*'अलल् डुर्र ';*
*'भीमाने मारला' भुरका.., भुर्र'*
*बकासुराने मारली थप्पड,*
*भीम म्हणाला, ''लोणचे फक्कड!''*

मित्र-मैत्रिणींनो, आता पहा भीम आणि बकासुराची आपल्याला माहीत असलेली गोष्ट विंदा आजोबांनी किती मजेशीर शब्दांत सांगितली आहे. तो न पाहिलेला बकासूर आणि भीम हे अगदी आपल्यासमोर दिसू लागतात. बकासुराचे विलक्षण ओरडणे जसे जाणवते, तसे भीम किती बलदंड आहे; बकासुराने कितीही ठोसे लगावले, तरीही आपला भीम कसा मजेने, बिनधास्त जेवण करतो आहे, त्याचे एक मजेशीर चित्र आपल्यासमोर उभे राहते. त्यातही बकासुराच्या ओरडण्याची जशी गंमत आहे, त्याप्रमाणे आमटीचा भुरकाही आहे; आणि फक्कड लोणच्याची रंगत आहे. मनाचा आनंद घेता घेता, आपल्या अभिजात मराठी भाषेची लज्जत चाखता येते.

आपल्या ओळखीच्या प्राण्यांचा एक धमाल दवाखाना विंदा आजोबा आपल्यापुढे उभा करतात.

आता अशी कवितेतील गंमत अनुभवताना, आपणही कल्पनेची भरारी घ्यायची. पहा :

*गाढव म्हणाले, ''कान लांब.''*
*कुत्रा म्हणाला, 'शेपूट वाकडी.'*
*डॉक्टर म्हणाला, ''सांगतो उपाय, रोज रात्री, खा काकडी!''*

वाकडी नि काकडीचे मजेशीर ताल देत हसणारे यमक जसे आहे, तसे केवळ कवितेतील कल्पनेच्या प्रदेशात घडणारे प्राण्यांचे खुमासदार संभाषणदेखील आहे.

लय तालाची सोबत संगत करत, विंदा आजोबा आपल्यापुढे निसर्गाचा एक आगळावेगळा लपंडाव कसा उभा करतात, ते पहाच.

*कळीमध्ये लपते फूल;*
*फुलामध्ये लपते बी;*
*बियांमध्ये लपते झाड*
*नारळामध्ये लपतो माड.*

बघा, आधी जे दिसत नाही, पण त्यातूनच निसर्ग आपले नवे रूप कसे व्यक्त करतो. एखाद्या रूक्ष भाषणातून सांगितले तर डुलकी येईल, पण विंदा आजोबा मिश्किल शैलीत निसर्गचक्र आपल्या समोर ठेवतात. ते बघण्याची आहे ना उत्सुकता? पहा -

*दर्यामध्ये लपतो ढग,*
*ढगामध्ये लपते नदी,*
*नदीमध्ये लपते पाणी,*
*... गळ्यामध्ये लपतात गाणी.*

आपण नकळत दाद दिलीत, 'व्वा!' अशी! ही किमया घडली कशी? तर निसर्गाचे हे एकातून दुसऱ्या रूपात प्रकटणे आपण पाहिलेले असते, पण त्यात अशी गंमत आहे हे ही आपली सुंदर, समर्थ मराठी भाषा आपल्याला दाखवते.

नेहमीच्या दैनंदिन जीवनात व्यवहारासाठी बोलतो ती आपली भाषा कथा कवितांतून कशी वेगवेगळी रूपे घेऊन येते, ते पाहण्याचा नि मग आत्मसात करण्याचा आनंद हा आयुष्य समृद्ध करण्याचा उत्सव आहे. विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, राजा मंगळवेढेकर, इंदिरा संत, शांता शेळके अशा अनेक नामवंतांनी तुमच्यासाठी लिहिलेल्या कविता जरूर वाचा, आपल्या आई-बाबांना मोठ्याने वाचून दाखवा. त्यातील नादाचा, लय, तालाचा आणि गमतीदार कल्पनांचा आनंद घ्या नि मग स्वतःही कविता, कथा लिहायचा प्रयत्न करा.

**संपर्क : ९८२०३८९४१४**




# शब्दांची गुंफू या माळ

डॉ. नीलिमा गुंडी

‘‘आई’’, केदार आईला हाका मारतच घरात शिरला. शाळेतली एक गंमत आईला कधी सांगतो, असं त्याला झालं होतं! आई दिसताच तो हसत हसत सांगू लागला, ‘‘अगं, आज आमच्या शाळेत ‘भाषेतल्या गमतीजमती’ या विषयावर एका ताईने भाषण दिले. त्यातली एक मजा ऐक. एक मुलगा होता. तो खरा होता भित्रा. पण ‘आपण शूर आहोत’, असा आव आणून गप्पा मारत असे. त्याच्या बाता ओळखायला भाषा छान कळावी लागते. त्यांनी एकदा घरी येऊन आईला सांगितलं, ‘समोरच्या वाड्यातल्या मुलांशी माझं भांडण झालं. त्यांनी मला मारलं. मला त्यांनी मारलं. हेच तो पुन्हा पुन्हा सांगत राहिला!’ आई, त्या मुलाने कोणाला मारलं नाही – त्याला मारता आलंच नाही! तोच इतरांचा मार खात होता. पण सांगायचा आव काय?’’ केदार हसतच राहिला.

‘‘अरे, यातली भाषेची खुबी तुला कळली का? वाक्यात नेहमी कर्ता पहिल्यांदा येतो. त्यामुळे त्यांनी मोठ्या हुशारीने ‘मला त्यांनी मारले’ असे म्हणताना

स्वतः काहीतरी पराक्रम केल्याचा आव आणला. पण वाक्यामध्ये कर्ता, कर्म यांच्या क्रमाइतकेच महत्त्व त्यांना जोडलेल्या प्रत्ययांनाही असतं. विभक्ती प्रत्यय, शब्दयोगी अव्यय हे शब्दाला जोडून येतात. त्यांच्यामुळे वाक्याचा अर्थ लागतो. या प्रत्ययांना वेगवेगळे अर्थ असतात. एखादी माळ गुंफताना आपण मणी कसे गुंफतो, तसे या प्रत्ययांमुळे शब्द एकमेकांच्या जवळ येऊन अर्थ जोडून देतात. हे त्या मुलाच्या लक्षातच आलं नव्हतं!'' आईने केदारला छान समजावलं.

तेवढ्यात हे सगळं ऐकणारी किमया आली नि म्हणाली, ''आई, 'मुंगी साखरेचा रवा'' म्हणजे काय गं? मुंगी ही साखरेचा कण कशी होईल?''

''तुझी शंका बरोबर आहे किमया! अगं, ही ओळ संत तुकारामांच्या प्रसिद्ध अभंगातली आहे.

**लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा ।**
**ऐरावत रत्न थोर, तया अंकुशाचा मार ।**

ही ओळ जुन्या काळातली आहे. त्यामुळे ती नीट जुळवून अर्थ लावायचा असतो. संत तुकाराम म्हणतात, की 'देवा! तू मला लहानपण दे. (लहानशा) मुंगीला – येथे आपण मुंगीच्या पुढे 'ला' हा विभक्ती प्रत्यय लावला बरं का! साखरेचा कण (गोड खाऊ!) मिळतो. ऐरावत हा समुद्रमंथनातून मिळालेला इंद्राचा हत्ती... रत्न म्हणून महत्त्वाचा! पण हत्तीवर बसणारा माहूत त्याला अंकुशाने मारून प्रसंगी नीट चालायला लावतो! तेव्हा लहानपणच बरं! आता कळलं का?'' ''अगदी छान कळले!'' दोघांनी एकाच वेळी मान हलवली.

''आई, आमच्या वर्गात विभक्तीप्रत्ययांचा तक्ता आहे. त्यांचे अर्थ इतके महत्त्वाचे असतात हे माहीत नव्हते! आई, खरंच गं! समजा 'मी, शाळा, 'घर' हे




नुसते तीन शब्द दिले; तर काहीच अर्थ कळणार नाही. 'मी शाळेतून घरी आले' की मी घरून, शाळेत आले हे त्या त्या शब्दांच्या प्रत्ययामुळेच कळले.'' किमया म्हणाली, ''आणि शब्दयोगी अव्यय म्हणजे गं काय?'' पटकन केदार मिश्कीलपणे हसत म्हणाला, ''मी बाबांना माझ्यासाठी बंगळुरुहून नारळाची खास पोळी आणायला सांगितली आहे. माझ्यासाठी बरं का?'' ''ए, आलाय मोठा शहाणा! मी माझ्यासाठी खास मिठाई आणायला सांगितली आहे!'' किमयाच्या या बोलण्याचा सूर भांडणाचा होता–आई म्हणाली, ''अगं, त्या वाक्यातलं 'साठी' हे शब्दयोगी अव्यय महत्त्वाचे आहे. कोणासाठी काय आणायचं, हे तितके महत्त्वाचं नाही बरं!''

''खरंच की! आई, विभक्ती प्रत्यय, त्याच्या आधी होणारे शब्दाचे सामान्य रूप, त्याच्याऐवजी अधूनमधून येणारी शब्दयोगी अव्यये हे सगळे काम किती किती महत्त्वाचे आहेत. 'रूप लहान, पण काम महान' असे आहेत अगदी! आपण प्रत्येक फूल ओवलं की त्याभोवती दोऱ्याला गाठ मारतो नि हार छान गुंफतो. तसे, विभक्ती प्रत्यय वाक्याचा अर्थ पूर्ण करायला मदत करतात.'' केदारला नवीन काहीतरी कळल्याचा आनंद झाला होता. आईने त्याला हलकेच शाबासकी दिली.

**संपर्क : ९८८१०९१९३५**

'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक हेमंत बाबर यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नंबर १ ते १०, ई–१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक – अनुराधा ओक

'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Hemant Babar, Printed at M/s. Printplus Private Limited., G-1 to G-10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka Bhiwandi, Dist-Thane 421311. and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004. * Editor - Anuradha Oak

# गंमत शब्दांची

प्रा. विश्वास वसेकर

संपर्क : ९९२२५२२६६८

## लांगूलचालन



लांगूल म्हणजे शेपूट आणि चालन म्हणजे हलवणे. लांगूलचालन म्हणजे शेपटी हलवणे. कुत्रा आपल्या मतलबासाठी त्याच्या मालकासमोर आपली शेपटी हलवत असतो आणि ती शेपटी हलवताना कोणत्या तरी अपेक्षेने मालकाकडे पाहत असतो. हा गुण काही माणसांमध्ये सुद्धा आपल्याला दिसून येतो. आपल्या मालकाची आपल्यावर कृपा व्हावी म्हणून स्वतःकडे कमीपणा घेत, काही माणसे जे लाजिरवाणे वागतात, त्या वागण्याला 'लांगूलचालन' म्हणतात.



## कावड

बांबूच्या किंवा इतर झाडाच्या एका तीन-चार हात लांब लाकडाच्या दोन्ही टोकाला शिंक्याच्या रचनेप्रमाणे दोऱ्या बांधलेले साधन. शेतकरी यात घागरी ठेवून वाहून नेतात. ही कावड खांद्यावर ठेवून एकाच वेळी दोन घागरी वाहून नेता येतात. कधी कधी घागरीच्या गळ्याला दोर बांधून त्या दोऱ्या लाकडाच्या टोकास बांधल्या जातात व ते लाकूड खांद्यावर ठेवून घागरी वाहून नेल्या जातात. शेतकरी इतर वापरासाठी पाणी आणताना जसे कावडीचा वापर करतात तसेच प्रसंगी लहान रोपांना (कापूस, मिरची इ.) घालण्यासाठीचे पाणी कावडीने वाहून आणतात.

## वडगण/ वटकन



ग्रामीण भागात पातळ कालवणासाठी (उदा. कढी, आमटी, पातळभाज्या), वेगळी वाटी घेण्याची कधी गरज वाटत नाही. आपल्या खोलगट ताटामध्येच एका बाजूला हे कालवण घेऊन त्या बाजूच्या विरुद्ध दिशेला त्या ताटाखाली एखादा गवरीचा, लाकडाचा किंवा कोळशाचा तुकडा किंवा दगड, काड्यापेटी ठेवून ते कालवण ताटभर पसरू नये अशी व्यवस्था करतात. ताटाला लावलेले हे जे टेकण असते त्याला 'वडगण' किंवा 'वटकन' म्हणतात.



## उखळ

धान्य सडण्यासाठी किंवा कांडण्यासाठी दगडाचे केलेले खोलगट पात्र म्हणजे उखळ. पूर्वी घर बांधताना गृहिणीला सहज वापर करता येईल असे हे उखळ स्वयंपाक घरात किंवा स्वयंपाक घराजवळ असे.

# प्रश्नमंजूषा

डॉ. सुधीर मोरे

१. ''विंध्याद्रीपासौनी दक्षिण दिशेसी ।
कृष्णानदीपासौनी उत्तरेसी ।
झाडीमंडळापासौनी पश्चिमेशी कोकणपर्यंत ।
महाराष्ट्र बोलिजे ।।'' असे महाराष्ट्राच्या चतु:सीमेचे वर्णन कोणी केले आहे?
अ) केशिराज बास आ) नागदेवाचार्य
इ) डिंभ कृष्णमुनी ई) भास्करबाबा जामोदेकर

२. 'विवेक सिंधू' या ग्रंथाचे ग्रंथकार कोण?
अ) आद्यकवी मुकुंदराज आ) संत ज्ञानेश्वर
इ) संत नामदेव ई) समर्थ रामदास

३. 'संत वाटिकेतील जाईची वेल' म्हणून कोणाचे वर्णन केले जाते?
अ) संत कान्होपात्रा आ) संत जनाबाई
इ) संत मुक्ताबाई ई) संत बहिणाबाई

४. 'मराठी काव्याची प्रभात' म्हणून कोणत्या काव्याचा उल्लेख केला जातो?
अ) पंडिती काव्य आ) शाहिरी काव्य
इ) अभंग ई) यापैकी नाही

५. 'फुलामुलांचे कवी' असे कोणास म्हटले जाते?
अ) केशवसुत आ) विंदा करंदीकर
इ) रे. नारायण वामन टिळक ई) बा.सी. मर्ढेकर

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेले वृत्तपत्र कोणते?
अ) जनता आ) दीनमित्र
इ) काळ ई) केसरी

७. 'ज्ञानकोशकार' म्हणून कोणाचा गौरव केला जातो?
अ) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
आ) गोपाळ गणेश आगरकर
इ) श्रीधर व्यंकटेश केतकर
ई) नरसिंह चिंतामण केळकर

८. कोणत्या महिला साहित्यिकेला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान प्राप्त झाला आहे?
अ) कुसुमावती देशपांडे आ) डॉ. तारा भवाळकर
इ) दुर्गा भागवत ई) वरील सर्व

९. लेखनदृष्ट्या योग्य शब्द ओळखा.
अ) शारीरिक आ) शारिरिक
इ) शारीरीक ई) शारिरीक

१०. खालीलपैकी कोणी काव्यासाठी 'गोविंदाग्रज' व विनोदी लेखनासाठी 'बाळकराम' हे टोपणनाव धारण केले?
अ) ना.सी.फडके
आ) अनंत सामंत
इ) रत्नाकरी मतकरी
ई) राम गणेश गडकरी

संपर्क : ९४२२०००६११

**प्रश्नमंजुषा फेब्रुवारीची २०२६ ची उत्तरे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ – आ | २ – अ | ३ – इ | ४– ई | ५ –अ |
| ६ –आ | ७ – आ | ८ – अ | ९ – ई | १० – अ |



माणिक पुरी

# रानसखा धनेश

उन्हाळा सुरू झाला की, झाडांच्या पानांचा रंग पिवळा दिसे. दोन – चार दिवसांनी पिवळी दिसणारी पाने गळून जायची. सगळं झाड बोडखं दिसायचं. काही दिवसांनी झाडे हिरव्या पानांनी डवरून जायची. पिंपळकुळातील झाडं फळांनी लदबदून जायची. वडा – पिंपळाच्या झाडावर अनेक पक्षी उतरत. कोकिळा, बुलबुल, हरोळी, तांबट, धनेश अशी कितीतरी पाखरे झाडांची फळे खाण्यासाठी हमखास यायची.

धनेश पक्षी माझे लक्ष वेधून घ्यायचा. तो वेंधळेपणाने उडत – उडत पिंपळावर उतरायचा. पिकलेली रसाळ फळं चाखायचा. तो अनेक फळे खायचा. मला तो खादाड पक्षी वाटला. तो पिंपळ, वड, उंबर, अंजीर, अशोक, जांभूळ आणि कडुलिंबाची फळं आवडीने खातो. त्याला फळे खूप आवडतात तसेच तो नाकतोडे, गोगलगाय, सरडा आणि अळ्यासुद्धा आवडीने खाताना मी पाहिलंय.

धनेशचा रंग राखाडी. नर आणि मादी दोघेही दिसायला सारखेच. तरीही दोघांत ओळखीच्या खुणा आहेतच.

धनेश नराच्या चोचीची वरची आणि खालची बाजू अर्ध्यापर्यंत पांढऱ्या रंगाची दिसते. शिंगाचा रंग काळपट तसा उर्वरित चोचीचा रंगही काळपटच! डोळ्यांचा रंग लाल आणि बुबुळाचा रंग जणू काळा ठिपका! डोळ्यांची कडा काळपट. भुवईपासून जाड पांढऱ्या रंगाची पिसे मानेपर्यंत वळलेली दिसतात. सगळा गळा राखाडी रंगाचा. खांद्यावरील दोन्ही बाजूच्या पंखांवर हलकेसे खवले असल्यासारखी पिसे दिसून येतात. शेपटीकडील पिसांचा

रंग थोडा गडद राखाडी दिसत असे. गुडघ्यापर्यंतची पिसे पांढरट रंगाची. बोटापर्यंतचा भाग मात्र उघडाच. एका पायाला चार बोटं. नखांचा रंग काळपट. मी पाहिलेल्या धनेशच्या शेपटीकडची पिसे अधिक उठून दिसत.

डावीकडून शेपटीचे पहिले पीस थोडे खराब झालेले दिसले. त्यानंतरची तीन पीसे सारखीच. पाचवे पीस सर्वात लांब होते. त्याच्या टोकाला पांढरा पट्टा नव्हता. इतर सातही पिसांच्या टोकाला पांढरा पट्टा त्यानंतर काळा पट्टा आणि उर्वरित पिसांचा रंग राखाडीच! शेवटची तीन पिसे सारखी दिसायची.

धनेश मादी नरापेक्षा किंचित लहान दिसते. तिच्या चोचीवरचे शिंग अर्धवटच दिसते. नर पक्ष्याच्या चोचीपेक्षा मादीच्या चोचीचा रंग अधिक पांढरा दिसतो. ती ढोलीत असते तेव्हा तिच्या अंगावरची काही पिसे गळून पडतात. ढोलीतून बाहेर आल्यावर तिचे डोळे लालसर पिवळसर दिसू लागतात. तेव्हा ती काहीशी अशक्त जाणवते.

नर आणि मादी दोघांसोबत पिल्लेही दिसतात. परंतु उन्हाळा सुरू झाला की दोघे जोडीने वावरतात. नर वडा-पिंपळाची रसाळ फळं मादीला खाऊ घालतो. त्यांची घरटी करण्याची लगीनघाई सुरू झालेली असते.

घरट्यासाठी धनेश पक्षी झाडाच्या ढोलीचा वापर करतात. झाड कोणतेही असो पण ढोली असली पाहिजे. परभणी जिल्ह्यात नारळाच्या खोडातली रिकामी ढोली घरट्यासाठी निवडल्याची नोंद सापडते. सुतार पक्षी नारळाच्या खोडात ढोली बनवतात. त्यांची विण संपली की ढोलीतून निघून जातात. त्यानंतर दोन-तीन वर्षांनी धनेश पक्षी अशा रिकाम्या ढोलीत स्वतःचा संसार थाटतात. धनेश पक्ष्याच्या विणीची मजेशीर गोष्ट आहे.

उन्हाळ्यात धनेशची मादी ढोलीची निवड करते. त्या ढोलीत जाऊन बसते. मादी स्वतःच्या विष्ठेपासून ढोलीचा दरवाजा बनवते. कधी-कधी नर मादीला चिखल आणून देतो. ती चिखलाने स्वतःला ढोलीत बंदिस्त करून घेते. तिची लांब चोच थापीसारखी त्या चिखलावरून फिरत राहते. ढोलीला दोन दरवाजे बनवले जातात. फळे खाऊ घालण्यासाठी मध्यभागी लहानशी फट ठेवतात. त्यानंतर मादी दीड महिना त्या ढोलीत बंदिस्त असते. ती अंडी देते. अंडी उबवते. पिल्ले दहा-बारा दिवसांची झाली की, मादी ढोलीचा दरवाजा तोडून बाहेर येते.

मादी दीड महिना ढोलीत असते तेव्हा ती विष्ठा कुठे करीत असावी? या प्रश्नाचे उत्तर सततच्या निरीक्षणातून समजले. मादीने शोधून काढलेला उपाय पाहून मला नवल वाटले.

मादीने विष्ठा टाकण्यापूर्वी नर झाडाच्या सालीचे तुकडे (ढलप्या) आणून देतो. त्या तुकड्यावर ती विष्ठा करते. तो तुकडा फटीतून नराकडे देते. नर तो तुकडा दूर नेऊन टाकतो. अशा प्रकारे मादी ढोलीची स्वच्छता ठेवते.

मी पाहत असलेल्या धनेशच्या जोडीतील मादीच्या दीड महिन्याच्या काळात नर तिची फार काळजी घ्यायचा. सकाळ झाली की, रसाळ फळं खाऊ घालायचा. त्यानंतर नाकतोडे, एखादा सरडा अशी मेजवानी द्यायचा. कितीही संकटे आली तरी तो मादीला खाऊ घालायला विसरायचा नाही.

मादी ढोलीचा दरवाजा तोडून बाहेर आल्यानंतर पुढील तीन-चार दिवस फारच खबरदारीचे असायचे. त्या काळात पिल्ले खाली पडण्याची शक्यता असायची. शिकारी प्राणी पिल्लांना इजा करू शकतो म्हणून पुन्हा एकदा त्या ढोलीचा एक दरवाजा बंद करायची वेळ पिल्लांवर येऊन ठेपते. पिल्ले स्वतःला बंदिस्त करून घेतात. त्या कामी नर आणि मादी दोघेही मदत करतात.

त्यापुढील एक महिना पिल्ले ढोलीतच राहतात. नर आणि मादी दोघेही पिल्लांना खाऊ घालतात. झाडांची फळे तसेच नाकतोडे, सरडे आणि गोगलगायीसुद्धा खाऊ घालत असतात.

मादी सालीच्या तुकड्यावर विष्ठा करायची. परंतु पिल्लांची विष्ठा टाकण्याची पद्धत निराळी होती. पिल्ले विष्ठा टाकण्याची जागा फटीच्या मधोमध आणत असतात. जोर लावून विष्ठा बाहेर टाकत. त्यामुळे ढोलीची स्वच्छता आपोआप राखली जायची.

नर आणि मादी दुपारच्या वेळी जवळच्या झाडावर आराम करायचे. पण रात्रीच्या वेळी कुठे मुक्काम करत



असावीत हे मला कळले नाही. त्यांची पिल्ले ढोलीत असल्यामुळे जवळच्या एखाद्या झाडावरच असावीत एवढं मात्र खरं! पिल्लांचा आवाज आला की, नर लगेच येत असे.

मी पाहिलेली ढोली नारळाच्या खोडात होती. दररोज सकाळी झाडाखाली पडलेली फळे, मादीची पिसे, गोगलगायीचे शंख, ढलप्या, फळांच्या बिया जमा करायचो. त्याची वेगळी नोंद ठेवायचो. एकूण ८३ दिवसाच्या नोंदी केल्या आहेत.

धनेश पक्षी ढोलीजवळ आला की, मैना खूप आवाज करायच्या. कधी- कधी मैनेच्या आवाजावरून धनेश ओळखू येत असे. पक्ष्यांच्या आवाजाची भाषा कळू लागली की, पक्षीनिरीक्षण करणे सोपे जाते हा माझा अनुभव.

एकदा धनेश पक्ष्याला मैनेचा फार राग आला. तो मैनेच्या घरट्यात डोकावला. मैनेचे घरटे चोचीत पकडले आणि बाहेर फेकून दिले. त्या काड्यांत मैनेची दोन अंडीसुद्धा होती. ती अंडी फुटून गेली तेव्हा मैनेने खूप आक्रोश केला. मैनेचं त्याच नारळाच्या झाडावर घरटं होतं. एकाच झाडाने दोन्ही पक्ष्यांची विण अनुभवली होती. धनेशने एवढे मोठे नुकसान करूनही मैनेने तिची ढोली (घरटं) बदलली नाही. त्यांनी एकमेकांचं सहजीवन जाणून घेतलं होतं.

धनेशची दोन पिल्ले ढोलीतून बाहेर येण्याची वेळ आली होती. नर आणि मादी दोघेही आपल्या पिल्लांना फळाच्या झाडापर्यंत कशी घेऊन जातील हे मला पाहायचे होते. पिल्लं केव्हाही ढोलीचा दरवाजा तोडून बाहेर येणार होती. ती पिल्ले दिवसाच बाहेर येतील हे पक्के माहीत होते. कारण नर आणि मादी दिवसभर पिल्लांना खाऊ घालायचे. रात्री आराम करायचे. पिल्ले ढोलीतून बाहेर येण्यासाठी ऑगस्ट महिना उजाडला.

तो ऑगस्ट महिन्यातील दुसरा आठवडा होता. सकाळी आठ वाजता ती पिल्लं बाहेर आलेली दिसली. ढोलीचा डावा दरवाजा खाली पडला होता. तो उचलून बॅगेत ठेवला. त्यानंतर पिल्लांचा पाठलाग सुरू केला. नर आणि मादी दोघेही एका - एका पिल्लांचा सांभाळ करू लागले. कधी कधी एकत्र येऊ लागले. संध्याकाळी शिरीषच्या झाडावर मुक्कामाला यायचे. यापूर्वी त्यांची मुक्कामाची जागा पाहिलेली नव्हती. धनेश पक्ष्यांची पिल्ले वर्षभर आपल्या आई-बाबासोबत राहणार होती. त्यांच्या पंखांत बळ आले की, आकाशाला गवसणी घालणार होती.

**संपर्क : ९८८१९६७३४६**

सुधीर साबळे

# झालाना पॅटर्न

जगातील अनेक भागांमध्ये 'माणूस आणि बिबट्या मधला संघर्ष' ही एक दुर्दैवी वस्तुस्थिती आहे. जमिनीच्या संसाधनांसाठी होण्याचा स्पर्धा व त्यातून मानव आणि बिबट्यांच्या अधिवासांचे एकमेकांवर होणारे आक्रमण यांमुळे हा संघर्ष आणखी तीव्र होतो. बिबट्यांना मानवांची भीती वाटत नाही आणि ते मानवांवर विशेषतः मुले आणि महिलांवर हल्ला करण्याचे धाडस करतात. यामुळे मानवी मृत्यू आणि बिबट्यांच्या हत्येचा धोका निर्माण होतो. अलीकडच्या काळात महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये बिबट्याने माणसांवर हल्ला केल्याच्या घटना घडत आहेत. गेल्याच आठवड्यात शिरूरमध्ये दोन लहानग्या मुलांचा बिबट्याच्या हल्ल्यामध्ये मृत्यू झाला. त्यामुळे माणूस आणि बिबट्या यांच्यामधील संघर्ष दिवसेंदिवस वाढत असल्याचे समोर येत आहे.

आता गावाबरोबरच महाराष्ट्राच्या शहरांत राहणाऱ्या मंडळींनाही बिबट्याची भीती सतावू लागली आहे. भविष्यात बिबट्याच्या शहरी परिसरात वाढत जाणाऱ्या वावरामुळे मनुष्यावरील हल्ल्याचे संकट गहिरे होऊ शकते. महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये सध्या ही परिस्थिती पाहायला मिळत असली तरी राजस्थानमधील जयपूर शहराच्या मध्यभागात असणाऱ्या 'झालाना' या परिसरात बिबट्यांचा वावर खूप मोठ्या प्रमाणात आहे; मात्र, तिथे मनुष्य आणि बिबट्या यांच्यामध्ये कधीच संघर्ष होत नाही, तिथे बिबट्याने माणसावर हल्ला केल्याच्या घटना होत नाहीत. जयपूरमधील 'झालाना' हे एक अद्विवतीय ठिकाण आहे जिथे मानव-बिबट्यांचे अभूतपूर्व सहअस्तित्व आहे. वन्य बिबटे अनेक दशकांपासून शांततेत माणसांबरोबर सहअस्तित्वात राहतात आणि आजपर्यंत तिथे एकही मानवी जीवितहानी झालेली नाही. याचा नेमका फॉर्म्युला काय आहे, हा झालाना पॅटर्न कसा आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. बिबट्याकडून माणसावर होणारे हल्ले रोखण्यासाठी हे मॉडेल महाराष्ट्राबरोबरच देशाच्या अन्य भागांत राबवले गेले तर ते मनुष्य आणि वन्यप्राणी यांच्यात होणारा संघर्ष वरदान ठरू शकते. मात्र, सरकारने दोन पावले पुढे येऊन तीव्र इच्छाशक्तीने काम केले तर राज्यात ही त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो.



**असा आहे झालाना मॉडेल**

जयपूरच्या आजूबाजूला असणाऱ्या खेड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बिबटे आहेत आणि ते सर्व माणसांवर हल्ले न करता त्यांच्याबरोबर राहतात. बिबट्यांमुळे या भागातील पर्यावरणाचे संवर्धन अगदी चांगल्या प्रकारे होत आहे. झालानाच्या जंगलात बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे या भागात जंगलात

घुसून होणारी अवैध वृक्षतोड होत नाही. त्यामुळे इथली निसर्गसंपदा सदाहरित असते. उन्हाळ्यात जयपूरच्या परिसरात उन्हाचा पारा ४७ अंशापर्यंत गेलेला असतो. मात्र, या परिसरात तापमानाचा पारा ४२ ते ४४ अंशापर्यंत असतो, हे कशामुळे तर तिथे असणाऱ्या गर्द वनराईमुळे! बिबट्यांचे मुख्य खाद्य आहे, ते भटकी कुत्री, आतापर्यंत या भागातील सुमारे ४३ टक्के भटकी कुत्री, इथल्या बिबट्यांनी फस्त केली आहेत शिवाय आजूबाजूच्या भागातील कुत्री या भागात येत असतात, त्यामुळे इथे असणाऱ्या बिबट्यांना ते खाद्य अगदी सहजपणे उपलब्ध होत आहे. भटक्या कुत्र्यांचे प्रमाण कमी असल्यामुळे इथे कुत्रा चावल्यानंतर होणाऱ्या रेबीज रोगाचे प्रमाण फारच कमी आहे. बिबट्यांमुळे या भागातील इको सिस्टिम चांगली राहण्यास मदत होत आहे. याबरोबरच सरकारकडून रेबीज प्रतिबंधक लस देण्यासाठी दरवर्षी होणाऱ्या २५ ते ३० लाख रुपये खर्चात बचत होते आहे. बिबट्यांमुळे या भागातील भटक्या कुत्र्यांची संख्या कमी झाल्यामुळे जयपूरमध्ये डॉग बाईटचे प्रमाण कमी आहे, असे निरीक्षण अनेक वर्षांपासून बिबट्याचे अभ्यासक असलेले स्वप्नील कुंभोजकर नोंदवतात. या भागात आजूबाजूला असणाऱ्या खेड्यांमध्ये गुजर समाज मोठ्या प्रमाणात राहतो आहे. त्यांच्याकडील जनावरे, म्हणजे गाई-म्हशी मरण पावल्यावर त्यांची विल्हेवाट लावणारी यंत्रणा महापालिकेकडे पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही, त्यामुळे ही मंडळी जनावरे मृत पावली की ती जंगलाच्या सीमेवर आणून टाकतात, त्यामुळे बिबट्यांना सहजपणे त्यांचे खाद्य मिळते, या सर्व कारणांमुळे या परिसरात बिबट्या आणि मनुष्य यांच्यामध्ये संघर्ष होताना दिसत नाही. भारतात गिधाडे मोठ्या प्रमाणात नष्ट झाली आहेत, पूर्वी मेलेली जनावरे खाण्याचे काम ती करायची; आता या भागात ते काम हे बिबटे करत असल्याचे दिसत आहे. थोडक्यात काय, तर बिबट्यांना त्याच्या अधिवासापासून ते त्यांना आवश्यक असणाऱ्या खाद्यापर्यंत सर्व काही या ठिकाणी उपलब्ध आहे, त्यामुळे इथे माणसांबरोबर त्यांचा संघर्ष होताना दिसत नाही. याबाबत इथे अनेक वर्षांपासून संशोधन सुरू आहे.

**वन विभागाचे मोठे काम**

'झालाना पॅटर्न' राबवताना इथे वन विभागाकडून अनेक नावीन्यपूर्ण योजना राबवण्यात येतात जसे की, स्थानिक लोकांमध्ये बिबट्याच्या संदर्भात जागरूकता निर्माण करणे आणि स्थानिक लोकांना संवर्धन प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करणे. बिबट्याच्या हल्ल्यांमुळे होणारे अपघात आणि मृत्यू टाळण्यासाठी स्थानिक लोकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. गावांमध्ये स्थानिक स्वयंसेवक पथके तयार करून, त्यांना बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी प्रशिक्षित केले जाते. हे स्वयंसेवक ग्रामपंचायती, ग्रामस्थांसोबत बैठका आणि वन विभागाच्या उपक्रमांमध्ये ग्रामस्थांना सहभागी करून घेऊन लोकांमध्ये जागरूकता निर्माण करतात. बिबट्याच्या हल्ल्यामध्ये गुरेढोरे, शेळ्या मारल्या गेल्यास वन विभाग पीडित व्यक्तीला त्वरित भरपाई देतो. त्यामुळे नागरिकांचा बिबट्या आणि वन विभागाप्रती निर्माण झालेला द्वेष कमी होतो. 'झालाना'मध्ये गावकऱ्यांच्या मदतीने सरकारी यंत्रणा, निसर्गप्रेमी मंडळी आणि गावकरी यांच्या माध्यमातून राबवण्यात येणारे हे मॉडेल भारतातील अन्य ठिकाणी राबवले गेले तर सध्या प्राणी आणि मनुष्य यांच्यामध्ये दिसत असणारा संघर्ष कमी करण्यासाठी, त्याची निश्चितपणे मदत होऊ शकेल, असे स्वप्नील कुंभोजकर आवर्जून मांडतात.

**संशोधकांचा सहभाग मोठा**

झालाना मॉडेलमध्ये वन्य संशोधकांनी केलेल्या वेगवेगळ्या संशोधनांचा वापर नवी धोरणे आखण्यासाठी करण्यात येतो, जसे की कॅमेरा ट्रॅपिंगद्वारे बेसलाइन डेटा जमा करणे. त्यामधून बिबट्यांचा आहार, प्रदेशाचे नमुने आणि बिबट्यांच्या संख्येचे निरीक्षण याचे काम करण्यात येते. ही माहिती राज्य सरकारला देण्यात येते. त्याचा अभ्यास करून संवर्धन धोरणे तयार करण्यात येतात. जर मानवी वस्तीत बिबट्यांकडून हल्ला झाल्याची घटना घडली तर त्यासाठी पशुवैद्यकीय, वनरक्षकांचा समावेश असलेल्या बचाव पथकाची निर्मिती इथे करण्यात आली आहे. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी सापळा लावण्याची आधुनिक उपकरणे, अत्याधुनिक वाहने, बचाव पिंजरे

इथे सुसज्ज आहेत. बिबट्यांबाबत कोणत्याही घटनेची तक्रार करण्यासाठी एक समर्पित हेल्पलाइन क्रमांक देण्यात आला आहे. बिबट्या जंगलात परतण्यास अयोग्य असेल तर त्याला पुनर्वसन केंद्रातील एका समर्पित कक्षात दाखल करण्यात येते.

**बिबट्या आणि माणसाचा संघर्ष नेमका आहे कसा?**

भारतामध्ये बिबटे सर्वदूर पसरलेले आहेत, त्यांचा वावर अगदी खेड्यापाड्यांपासून ते शहरांपर्यंत, अगदी मनुष्यवस्तीच्या जवळ दिसून येत आहे. बिबट्याला कोणत्याही इको सिस्टिममध्ये टाकले तरी तो तिथे अगदी चटकन जुळवून घेतो. त्यामुळेच त्याचा आणि मानवाचा संघर्ष अधिक आहे. कान्हा, बांधवगड या परिसरांत वाघांचा वावर अधिक आहे, त्या ठिकाणी वाघ बिबट्याला आपल्या अधिवासात राहू देत नाही, त्यामुळे त्यांचा वावर जंगलाच्या सीमेवर मोठ्या प्रमाणात असल्याचे पाहायला मिळते. 'ज्या परिसरात दाट मनुष्यवस्ती आहे, शेती आहे, त्या ठिकाणी बिबट्याचा माणसांशी होणारा संपर्क अगदी अपरिहार्य आहे,' असे कुंभोजकर सांगतात. बिबट्या आणि मनुष्य यांच्यामधील संपर्क होण्याचे प्रमाण हे वाघ आणि सिंह यांच्यापेक्षा अधिक आहे. बिबट्याचे खाद्य हे खास करून कुत्री, मांजरे, डुकरे, गाई-म्हशींची वासरे हे आहे. बऱ्याचदा त्याला आपले खाद्य मिळाले नाही की तो खाद्याच्या शोधात मनुष्यवस्तीमध्ये येतो आणि लहान मुलांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करतो. बिबट्याकडून जेव्हा माणसावर हल्ला होतो तेव्हा माणसाकडून त्याला प्रतिकार होत नाही. बऱ्याचदा त्याला पळून जाणे देखील कठीण होते, त्यामुळे त्याला लहान मुलांवर हल्ला करणे सोपे जाते. त्यामुळे आपल्याला आपले खाद्य मिळाले नाही की, बिबट्याकडून माणसावर हल्ले होतात. मात्र, जयपूरमधला 'झालाना'चा परिसर मात्र, त्याला अपवाद राहिला आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये, असे कुंभोजकर सांगतात.

**अशी आहे महाराष्ट्रातील स्थिती**

महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने ठाणे, बोरिवली, जुन्नर, ताडोबा या परिसरांत बिबट्या मोठ्या प्रमाणात आढळतो. त्यापैकी बोरिवली आणि जुन्नर या परिसराच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात मनुष्यवस्ती आहे. बोरिवलीच्या आजूबाजूच्या भागात मनुष्यवस्तीच्या भागात हे बिबटे हिंडत असतात. मात्र, बऱ्याचदा ते दिसत नाहीत. काही वेळेला माणसांवर हल्ला झाल्याच्या घटना अनेकदा घडल्या आहेत. महाराष्ट्राच्या वन विभागाने बोरिवलीच्या परिसरात बिबट्यांवर चांगले काम केले आहे, त्यामुळे या ठिकाणी बिबट्याच्या हल्ल्यात माणसे मरण्याचे प्रमाण काही वर्षांमध्ये कमी झाल्याचे निरीक्षण स्वप्नील कुंभोजकर यांनी नोंदवले आहे. या उलट जुन्नरमधली परिस्थिती अशी आहे, या भागात जंगल कमी, त्यामुळे बिबट्यांची राहण्याची जागा कोणती असेल तर ती म्हणजे उसाचे शेत. त्यामुळे या भागातील बिबट्यांना (शुगरकेन लेपर्ड) असे संबोधले जाते. इथल्या वातावरणामुळे त्याच्या अधिवासात बदल झाले आहेत, त्यामुळे त्यांची वागणूक बदललेली दिसते. तरस हा प्राणी बिबट्याची पिल्ले मारतो, त्यामुळे बिबट्याला खूप सुरक्षित जागा लागते. ज्या ठिकाणी माणसांचा वावर असतो किंवा कोणतीतरी रस्त्याची कामे, अन्य उपक्रम सुरू असतात, त्या ठिकाणी जर बिबट्याचा वावर असेल तर आपल्या पिल्लांना सुरक्षित ठेवण्यासाठी त्याचा माणसांबरोबर संघर्ष होतो.

**शहरे सरकत आहेत जंगलाकडे.....**

वन्यप्राणी शहराकडे येत आहेत, असे बरेचदा बोलले जाते. पण त्यामध्ये काही तथ्य वाटत नाही त्याचे कारण म्हणजे आपल्याकडे लोकसंख्या झपाट्याने वाढत चालली आहे. ज्या ठिकाणी पूर्वी वन्य प्राण्याचे अधिवास होते, ते हळूहळू कमी होत चालले आहेत. शहरे प्राण्यांच्या भागात चालली आहेत, त्यामुळे त्यांचे नैसर्गिक अधिवास ही नष्ट होत चालले आहेत, त्यामुळे ही परिस्थिती बदलताना दिसत आहे. शहरे जंगलाकडे सरकत असल्यामुळे वन्यप्राण्यांचे जगणे, त्यांचा मोकळेपणा या सार्‍या गोष्टी हरवत चालल्या आहेत. त्यांच्यामध्ये आणि मनुष्यांमध्ये होणारा संघर्ष कमी करण्यासाठी पुढाकार घेऊन उपाय करणे गरजेचे आहे.

**संपर्क : ९४२१०८००७२**

# कुतूहल

योगेश दराडे, ९९२३७४०३७४

'किशोर' मित्रांनो, 'किशोर' फेब्रुवारी २०२६ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ मार्च २०२६ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

**१) साइट्स(CITES) करारावर स्वाक्षरी झाल्याच्या स्मरणार्थ कोणता दिवस साजरा केला जातो?**

अ) जागतिक कासव दिवस
ब) जागतिक वन्यजीव दिवस.
क) जागतिक समुद्र दिवस
ड) जागतिक पाणथळ जमीन दिवस

**२) पोलिओ लसीचा शोध कोणी लावला?**

अ) अलेक्झांडर फ्लेमिंग
ब) जोनास साल्क व अल्बर्ट साबिन
क) फेलिक्स हॉफमन
ड) सल्मन वॅक्समन

**३) क्षयरोगास (TB) कारणीभूत असणाऱ्या ('मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलॉसिस) या जीवाणूचा शोध कोणत्या शास्त्रज्ञाने लावला?**

अ) रॉबर्ट कॉक
ब) लुई पाश्चर
क) अँटोनी वॅन ल्युवेनहॉक
ड) डॉ. रॉबर्ट कॉक

**४) १९४२ च्या लढ्यातील 'चले जाव (क्वीट इंडिया)' ही घोषणा कोणी तयार केली होती?**

अ) नेताजी सुभाषचंद्र बोस ब) महात्मा गांधी
क) युसुफ मेहरअली. ड) जवाहरलाल नेहरू

**५) दांडी यात्रेतील पदयात्रा एकूण किती दिवस चालू होती?**

अ) ३५ दिवस ब) २४ दिवस
क) ४० दिवस ड) ५० दिवस

**६) भारताच्या नियोजन आयोगाची स्थापना केव्हा करण्यात आली?**

अ) १६ मार्च, १९५१ ब) १५ मार्च, १९५२
क) १७ मार्च, १९५३ ड) १५ मार्च, १९५०

**७) बंकिमचंद्र चटर्जी रचित 'वंदे मातरम्' या गीताला २०२६ मध्ये किती वर्ष पूर्ण झाली?**

अ) १५० ब) १२५ क) १०० ड) ६०

**८) नुकतेच निधन झालेले डॉ. माधव धनंजय गाडगीळ कोणत्या क्षेत्राशी संबंधित होते?**

अ) विज्ञान ब) कृषी क) पर्यावरण ड) शैक्षणिक

**९) २०२६ च्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख पाहुणे ओळखा?**

अ) अब्देल फताह अल-सीसी
ब) अँटोनियो कोस्टा आणि उर्सुला वॉन डर लेयन.
क) मोहम्मद बिन झायेद अल
ड) इमॅन्युअल मॅक्रॉन

**१०) भारताचे 'दक्षता आयुक्त' म्हणून कोणाची नियुक्ती केली आहे?**

अ) प्रवीण वशिष्ठ ब) प्रवीण परदेशी
क) प्रवीण दिगंबर ड) तुकाराम मुंढे

**११) 'ग्रीनलँड बेट' कोणत्या देशात आहे?**

अ) अमेरिका ब) डेन्मार्क क) रशिया ड) कॅनडा

**१२) सर्बिया या देशातील 'नोव्हाक जोकोविच' हा खेळाडू कोणत्या खेळाशी संबंधित आहे?**

अ) क्रिकेट ब) हॉकी क) कबड्डी ड) टेनिस

१३) 'हाय सीज ट्रीटी' हा कायदा कशाच्या संवर्धनासाठी अधिकृतपणे लागू झाला आहे?

अ) खारवट जमीन ब) सह्याद्री डोंगर

क) गौण खनिज ड) समुद्र

१४) 'जागतिक भविष्य ऊर्जा शिखर परिषद' कोणत्या देशात पार पडली?

अ) जिनिव्हा (स्वित्झर्लंड) ब) न्यूयॉर्क (अमेरिका)

क) दावोस( स्वित्झर्लंड ) ड) अबु धाबी (यूएई).

१५) संयुक्त राष्ट्र पर्यटनच्या (UN Tourism) प्रमुख म्हणून कुणाची नियुक्ती करण्यात आली आहे?

अ) सर्जियो गोर ब) शेखा नासेर अल नोवाइस

क) सेबॅस्टियन लेकोर्नू ड) शाया मोहसिन झिंदानी

## चित्रकोडे (जानेवारी २०२६) यशस्वी स्पर्धक

- **सिंधुदुर्ग –** कु. अंश घाडी, कु. आध्या कानडे, कु. शुभ्रा राडये, कु. यशश्री राऊत, कु. मानवी राडये, कु. हर्षाली घाडी, कु. आनंद घाडी, कु. शौर्य ठुकरूल, कु. पूर्वा घाडी, कु. गौरांग साळस्कर, कु. प्रज्ञा आयरे, कु. देवांश चव्हाण, कु. गौरी दसुरे, कु. दिव्या गोरुले, कु. गौरी गोरुले, कु. जीनत शेख, कु. गौरव गोरूले, कु. गौरी आयरे, कु. सानवी तळेकर, कु. मेघना मेस्त्री, कु. कैलास सावंत, कु. दुर्वा चव्हाण, कु. स्वरूप परब, कु. आरहान साटविलकर, कु. सालिहा नावळेकर, कु. फातिमा नावळेकर, कु. साहिल नावळेकर, कु. रिहा नावळेकर, कु. प्रांजल नांदगांवकर, कु. पियुष तेली, कु. तनय लाड, कु. यासिन नावळेकर, कु. सनम नावळेकर, कु. मुजिफ पाटणकर, कु. साईराज नांदगावकर, कु. अनिस नावळेकर, कु. इकरा बशीर नावळेकर, कु. गौरव पाटील, कु. यश रेवडेकर, कु. इशांत मोरये, कु. वृषभ बिडये, कु. आहिल साटविलकर, कु. जान्हवी नानचे, कु. आरजु नावळेकर, कु. आसिया साटविलकर, कु. रिया बिडये, कु. माहिरा नावळेकर, कु. फैजान नावळेकर, कु. अमीर साटविलकर, कु. तन्मय पाटील, कु. आरहान पाटणकर, कु. शाहीद नावळेकर, कु. रत्नेश चव्हाण, कु. हार्वी मोरजकर, कु. महमदजैद नावळेकर, कु. खुशी पाताडे, कु. आफरा साटविलकर, कु. शनया तांबे, कु. आयुष तोडणकर, कु. मानस मोरये, कु. ईकरा नावळेकर, कु. आलिना साटविलकर, कु. दुर्वा जाधव, कु. सौम्या आमडोरकर, कु. विर्तिका शेर्लेकर, कु.आदित्य धुरी
- **पुणे –** कु. अनन्या डोके, कु. अर्शद तांबोळी, कु. आरुषी वाघ, कु. प्रिती सांडभोर, कु. फरीन तांबोळी, कु. अवंतिका निकम, कु. श्रावणी केदारी, कु. वरद टेमकर, कु.मृणाली कुचिक, कु. संतोषी भोर, कु. सुशांत भोर, कु. श्रेया कुचिक, कु. विराज कोरडे, कु. रोहिताक्ष करंजावकर, कु. पायल जाधव. कु. जान्हवी खरमाळे, कु. कृष्णा थोरात
- **ठाणे –** कु. श्रुती परांजपे, कु. अनन्या भेरे
- **सातारा –** कु. आद्यायणी पाटील
- **जळगाव –** कु. आनंदा लोखंडे, कु. अभिषेक सोनवणे
- **कोल्हापूर –** कु. अनूज पेडणेकर




- **सातारा –** कु. सुवीर फडे
- **सोलापूर –** कु. आरोही सोलकर
- **बुलडाणा –** कु. वैष्णव वाघळे
- **यवतमाळ –** कु. राखी पाटील
- **मध्य प्रदेश (इंदूर) –** कु. पावनी पैठणकर
- **अहिल्यानगर –** कु. तन्वी गदादे
- **छत्रपती संभाजीनगर –** कु. सुशांत महेर
- **लातूर –** कु. दत्तात्रय पुजारी
- **हिंगोली –** कु. श्रीरूप कोरडे, कु. वरद पती
- **सांगली –** कु. शार्दूल व्हनमोर
- **यवतमाळ–** कु. धनश्री चव्हाण
- **रायगड –** कु. साची मोरे, कु. मानस सदगीर, कु. शौर्य कुलकर्णी,
- **नागपूर –** कु. अवनीश जोशी

## कुतूहल (जानेवारी २०२६) यशस्वी स्पर्धक

- **सातारा –** कु. सुवीर फडे ■ **अहिल्यानगर –** कु. अर्पिता होन
- **नाशिक –** कु. अनय बारवकर
- **पुणे –** कु. पायल जाधव

## कुतूहल फेब्रुवारी २०२६ ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ –ड | २ – ड | ३ – ब | ४–अ | ५ –ड |
| ६ – क | ७ – अ | ८ – क | ९ – ड | १० – ड |
| ११– क | १२ – क | १३ – क | १४–ब | १५ –क |

# भावी आधारस्तंभ

**माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.**

- **तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?**
- **जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?**
- **ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?**

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/– चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



आई आणि बाबा बाजारात गेले होते. मी आणि शेजारचा आदिराज गृहपाठ पूर्ण करत बसलो होतो. अंगणातल्या झाडाच्या सावलीत बसून खेळायला, अभ्यास करायला आम्हां दोघांना खूप आवडते. आम्ही दोघेही लिहिण्यात दंग होतो. इतक्यात जोराने ओरडण्याचा आवाज आला. आम्ही दचकलो व आवाजाच्या दिशेने धावलो, पाहतो तर काय! मांजरीचे छोटेसे गोजिरवाणे पिल्लू! त्याच्या पायाला जखम झाली होती. त्या पिल्लाच्या पायावरून कुणाची तरी सायकल गेली असावी, असे आम्हांला वाटले. ते खूप घाबरले होते. आम्हीही घाबरून थोडे लांबच जाऊन उभे राहिलो. ते खूप ओरडू लागले. आम्ही पुन्हा त्याच्याजवळ जाऊन उभे राहिलो. ते इकडेतिकडे पाहत विचित्र आवाज काढत होते. पिल्लाच्या पायातून थोडेसे रक्त आलेले मला दिसले. लगेच मी घरातून हळद आणली, पाणी आणले व त्याच्या जखमेवर हळद लावली. त्याला पाणी पाजले. तेवढ्यात आई–बाबा आले.

आम्ही त्यांना सर्व काही सांगितले. मांजरीचे पिल्लू घराच्या पाठीमागच्या दिशेकडे पाहत होते. ते बाबांच्या लक्षात आले. बाबांनी घराच्या मागे जाऊन शोधले. आमच्या घरामागच्या पडक्या भिंतीजवळ एक मांजर व तिची ३–४ पिल्ले आम्हांला दिसली. ती मांजर या जखमी पिल्लांची आई असावी, असे आम्हांला वाटले. बाबांनी पिल्लाला अलगद उचलले आणि त्याच्या आईजवळ सोडले. आईला पाहताच ते पिल्लू आईला बिलगले.

**कु. स्वानंदी स्वप्नील शिंदे**

इयत्ता – ४थी, जि.प.प्राथमिक शाळा करलवस्ती (कडलास)

ता. सांगोला जि. सोलापूर ४१३३०९



शाळेची घंटा वाजली. शाळा भरली. पहिला तास मराठीच्या सरांचा होता. मग सरांनी मराठीचा धडा शिकवायला सुरुवात केली. सरांनी 'बाली बेट' हा धडा शिकवला नंतर दुपारची सुट्टी झाली. आम्ही सर्व मित्रमैत्रिणी खेळत होतो. तेवढ्यात एक लहान मुलगा घसरगुंडीवरून खाली पडला. तो खूप रडत होता. मग मी त्याला मलमपट्टी केली. तरीही तो खूप रडत होता. मग मी सरांना विचारून त्याला घरी घेऊन गेले. त्याच्या आईला सर्व घटना सांगितली. त्याचे आईने माझे कौतुक केले. मी शाळेत परत गेले. शाळेत गेल्यानंतर मी हा सर्व प्रकार सरांना सांगितला. सरांनीही मला शाबासकी दिली. नंतर शाळा सुटल्यानंतर मी माझ्या आईला सर्व काही सांगितले. आईनेही माझे कौतुक केले. मला खूप आनंद झाला.

**कु. समृद्धी अमोल मारवाडकर**

इ.७वी, जि.प.प्राथमिक शाळा, गोरेवाडी, मु. गोरेवाडी, पो. बुकनवाडी, ता.जि.धाराशिव ४१३५०९



एके दिवशी मी माझ्या वडलांसोबत धुळे येथे कपडे खरेदीसाठी गेले होते. रस्त्याने चालताना एक गर्भवती महिला दिसली. तो रस्ता गर्दीने गजबजलेला होता. गाड्या सुसाट वेगाने पळत होत्या. ती बाई थोडी पुढे चालत असताना तिला जोराची ठेच लागली. माझं तिच्याकडे लक्ष होतं. मी वडलांचा हात झटक्याने सोडला आणि त्या बाईला पट्‌कन पकडलं. माझ्यामुळे ती खाली न पडता सुरक्षित राहिली. मी तिला जवळच्या हॉटेलबाहेरच्या बाकावर बसवलं आणि पाणी दिले. तिला बरं वाटल्याची खात्री केल्यावर पुन्हा वडलांबरोबर पुढे गेले. ओळखीच्याच नाही तर अनोळखी व्यक्तींना मदत करावी हे माझे आईवडील, शिक्षक सांगतात. मी हे माझ्या वर्गशिक्षिकेला सांगितल्यावर त्यांनी माझ्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

**कु. अश्विनी गोरख पाटील**
जि.प.शाळा निकुंभे, पो. बुरझड, ता. जि. धुळे ४२४३०७.



मी माझ्या मित्रांसोबत सोमवारी शाळेतून घरी येत होतो. आम्ही सात जण चांगले मित्र होतो. आम्ही गोष्टी करत येत होतो. आम्हांला रस्त्यात तीन मोठे मोबाईल सापडले. आम्ही सर्व विचार करू लागलो की, हे तीन मोबाईल कोणाचे असू शकतील? मी माझ्या मित्रांना म्हटले की, हे बघा ट्रॅक्टरच्या चाकाचे निशान दिसले आणि तीनही मोबाईलच्या काचा फुटल्या होत्या. मग आम्ही विचार केला की, आपण हे मोबाईल ज्याचे असतील त्याला देऊ. आनंद देऊळकार 'हो' म्हणाला. मग आम्ही ट्रॅक्टरच्या चाकाच्या निशाणाच्या मागे गेलो. थोडं पुढे गेल्यावर एक ट्रॅक्टर आम्हांला दिसलं. मी माझ्या मित्रांना म्हणालो की, ''आपण यांना विचारू की हे मोबाईल तुमचे आहेत काय?'' सर्व 'हो' म्हणाले, मग आम्ही सर्व ट्रॅक्टरजवळ गेलो. मी त्यांना विचारले, ''हे मोबाईल तुमचे आहेत का?'' ते 'हो' म्हणाले. मग त्यांनी आम्हांला सांगितले की, ''आम्ही सर्वांनी आमचे मोबाईल एकत्र करून ट्रॅक्टरवरच्या साहित्यात ठेवले होते. पण ट्रॅक्टर मागे घेताना मोबाईल पडले व त्यावरून ट्रॅक्टरचे चाक गेले. माझे मित्र म्हणाले, ''यांना हे मोबाईल यांचे आहेत की नाही, हे तपासण्यासाठी आपण यांना सर्व मोबाईल्सचे लॉक उघडायला सांगू.'' मी त्यांना म्हणालो की, ''या पहिल्या मोबाईलचा लॉक उघडा.'' त्यांनी पहिल्या मोबाईलचा लॉक उघडला. मग इतर दोन मोबाईल्सचे लॉक उघडा असे सांगितल्यावर त्यांनी तीनही मोबाईलचे लॉक उघडले. मी त्यांना मोबाईल खरंच त्यांचेच आहे की नाही, हे तपासल्यामुळे माझ्या हुशारीचेही त्यांनी कौतुक केले. गावातल्या लोकांनी हे माझ्या घरी सांगितले तर माझ्या वडलांनी माझे कौतुक केले.

**कु. कार्तिक शिवहरी व्यवहारे**
इ.७ वी, जि.प.प्राथमिक शाळा, रुधाना,
ता. संग्रामपूर, जि. बुलडाणा ४४३४०२.

# उमलती प्रतिभा



## फुलपाखरू

*फुलपाखरू रे फुलपाखरू*
*अंगावर त्याच्या सोनेरी रंग,*
*नाजूक असते त्याचे अंग*

*हात लावताच पळून जाते,*
*दिसते छान फुलपाखरू ते.*

*मारू नका त्याला कोणी*
*होईल पाप आपल्या हातांनी.*

*फुलांवर बसते, हळूच हसते,*
*काळे-पांढरे ठिपके पंखांवर मिरवते.*

*दंग होते फुलांच्या दुनियेत*
*रंगीबेरंगी फुलपाखरू छान.*


कु. अन्वी संजय गर्जे
इ.४थी, जि.प.प्राथमिक शाळा, वाघाची
वाडी, ता. करमाळा, जि. सोलापूर ४१३२०३






## 'तिला' ही थोडं जगू द्या...

तिला शिकवा आणि शिकू द्या
थोडी तरी माणूसकी असू द्या,
जीवनात तिच्या सन्मान मिळू द्या
तिलाही थोडं जगू द्या...

शिकू दिले नाही. लग्न करून दिले
तिने सर्वांना मान दिला पण तिला मिळाला नाही,
आता तरी थोडा मान द्या..
तिलाही थोडं जगू द्या...

तिचीही काही स्वप्ने असतील
पूर्ण तिला करू द्या,
ती मुलगी... ती स्त्री... थोडे भान असू द्या
तिलाही थोडं जगू द्या...


नेहमी असते ती कामात
सर्व दुःख तिच्या मनात,
कधीतरी तिला आनंद द्या
तिलाही थोडं जगू द्या..


कु. प्रियांका गजानन पुंड
इ.९वी, जि. प.प्रशाला दूधगाव,
ता. जिंतूर, जि. परभणी

# रामूची युक्ती

रामू नावाचा एक हुशार शेतकरी राहत होता. एके दिवशी रामूची पत्नी गंगा आपल्या चिंतेत होती. रामूने ''काय झाले?'' असे तिला विचारले तर गंगा म्हणाली, ''अहो मी रोज स्वयंपाक करून शेतात जाते, तेव्हा आपल्या घरात काही उंदीर येतात आणि सगळं स्वयंपाक फस्त करतात.'' मग रामूला एक युक्ती सुचली. त्याने खाऊची एक ओळ केली व ओळीच्या अखेरीस एक पिंजरा ठेवला, पिंजऱ्यातही थोडा खाऊ ठेवला आणि दरवाजाचा नुसता आवाज काढला व रामू गंगा लपले मग लगेच एक उंदरांची फौजच आली आणि खाऊ खाण्यात ती इतकी व्यस्त झाली की, आपण पिंजऱ्यात आलो हेही त्यांच्या लक्षात आले नाही. मग सगळे उंदीर पिंजऱ्यात गेले व हळूच येऊन रामूने पिंजरा बंद केला. अशा प्रकारे रामूने कोणत्याही सजीवाचा जीव न घेता आपली समस्या सोडवली आणि त्या उंदरांना प्राणीसंग्रहालयात जमा केले.

**कु. किशोरी शहाजी बाबर**
इ.७ वी, नाझरा विद्यामंदिर शाळा,
ता. सांगोला, जि. सोलापूर ४१३३०८.




**कु. अन्वीता किशोर दसोरे**
संत गजानन महाराज ज्ञानपीठ, शेगाव,
बुलडाणा -४४४२०३.




**सायली संजय गावंडे,** C/O संजय जगदेव गावंडे
पावसाळे लेआउट, गजानन नगर, कौलखेड.
पोस्ट कौलखेड, ता. जि. अकोला - ४४४००४



**निकिता बेडके,** इ. ७ वी,
जि.प.प्राथमिक शाळा, पानगाव, ता. कळंब,
जि. धाराशिव ४१३५२५



**वेद दीपक पाटील,** प्राथमिक विद्यामंदिर बाहुबली
तालुका हातकणंगले जिल्हा कोल्हापूर
पिन कोड- ४१ ६० १०


जादूगाराची सुटका
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
म्हणजे, जादूगाराने पोलिसांना संमोहित केलं असावं म्हणूनच तर त्या गुंडाचा ट्रक पोलिसांना दिसला नसावा.
हा ट्रक या चेकपोस्टवरून शहराबाहेर जावा यासाठीच तर त्यांनी जादूगाराची मदत घेतली असावी.
कमाल आहे तुमच्या जादूची! जादूगार साहेब चला आता इथून लवकर...
दाराने थोड्या वेळासाठी गॉगल काढला
थांब. माझ्या डोळ्यांत बघ
आता दोन्ही हात वर कर.. मी पुढची सूचना देईपर्यंत असाच शांतपणे उभा रहा



जादूगाराने दाराला संमोहित केले..
तुझी ही बंदूक आता मी माझ्याकडे ठेवतोय.
विनय हे बघतच होता. तो धावतच तिथे आला.
मी तुमच्या दोन्ही जादू बघितल्या. आता पुढे काय?
मला माहीत होतं की तू आमच्या गाडीत लपला आहेस. मी याच संधीची वाट बघत होतो.
ए ! काय करताय तिकडे?
जादूगाराने पोलिसांना घडलेला प्रकार सांगितला
आणि तुम्हांला तो ट्रक दिसलाच नाही.
पण हे कसं शक्य आहे? एवढा मोठा ट्रक गायब कसा झाला?
जसा आता हा माणूस हात करून उभा आहे तसा.
क्रमशः

# चिमणी

■ विलास मोरे

तहानलेले पक्षी
तहानलेले प्राणी
कुठून आणतील
पिलांसाठी पाणी?

घरट्यात एकटे
वाट पाहते बाळ
चिमणी गेली भुर्र
घेण्या भरून चूळ

नदी नाले विहिरी
झाल्या कोरड्या ठाक
पाण्यासाठी घिरट्या
चिऊ घालते उन्हात

तुम्ही करू शकता
तिली थोडी मदत
सावलीत ठेवा, जा
दाणे पाणी वाटीत

प्रत्येकी दोन, चार
लावा झाडं मातीत
पाऊस कोसळेल
ओल्याचिंब मोत्यांत

चोची होतील तृप्त
आबादानी खोप्यात
भरलेला पाऊस
शिवाराच्या पंखांत

संपर्क : ७५८८००७८६६





इंग्रजी विभाग

# GARDEN OF LIFE





■ Roshankumar Pilewan

On the path of darkness,
Sow a little light;
For someone who is blind,
Help them gain their sight.
Famished with hunger,
Give them wholesome food;
Save them from starvation,
Protect their childhood.
For one who's lost their way,
Show the path that's right;
Guide a drifting boat ashore,
Fill their hearts with delight.
For those denied
The right to education,
Send them off to school
With hope and aspiration.
"Live and let live,"
Chant this mantra bright;
Let the garden of life
Bloom in warmth and light.





Contact : 7798509816



Dr. Sanjay Gaikwad

An academic exam is not the real exam of life. It is the exam of a particular subject or course. However, it holds great importance in a student's academic journey. Academic examinations shape our future and influence our real life. Therefore, students must take examinations seriously and try to pass them by proving their ability and potential. After understanding the importance of examinations, students must learn how to face them.

1. **Honesty in Examinations**: Honesty is the best policy. Students should never think about unfair means or malpractice. They should trust their own preparation and follow the path of honesty. Honest efforts always lead to good and lasting results.

# Facing Examinations **with Confidence**



2. **Power of Positive Thinking**: Students should understand the power of the unconscious mind. It works according to the thoughts we feed it. Negative thoughts bring negative results, while positive thoughts bring positive results. Therefore, students should always think positively and remain optimistic.
3. **Role of Confidence**: Confidence plays a major role in academic success. Students should believe in their memory, writing skills, and hard work. Confidence improves performance and reduces fear. When students face examinations bravely, success naturally follows.
4. **Happiness and Mental Balance**: Students should remain happy and relaxed while preparing for examinations. They should not feel unnecessary pressure in the classroom or examination hall. Happiness increases mental strength. A calm and peaceful mind works more effectively, helping students write answers properly.
5. **Importance of Proper Sleep and Rest**: Proper sleep and rest are essential before examinations. A tired mind cannot think clearly. Students should sleep for sufficient hours at night. Proper rest refreshes the brain, improves memory and helps students write answers confidently.
6. **Smart Revision Before the Examination**: One day before the examination, students should not try to study everything. They should revise only important points and recall what they have already studied. Light and focused revision is more effective than heavy and stressful study.
7. **Reaching the Examination Centre Early**: On the day of the examination, students should reach the examination centre well in advance. They should consider traffic or other possible problems and leave home early. This habit helps avoid tension, confusion, and last-minute stress.
8. **Reading the Question Paper Carefully**: Many students lose marks because they do not read the question paper carefully. Students should read all questions slowly and understand what is asked before answering. Careful reading helps avoid mistakes, saves time, and leads to better answers.
9. **Time Management in the Examination Hall**: Time management is very important during examinations. Students should divide time wisely for each question. They should avoid spending too much time on one question. Completing the paper on time reduces stress and improves overall performance.
10. **Neat and Clear Presentation**: Neat and clear presentation creates a good impression on the examiner. Answers should be written clearly and neatly. Proper spacing, headings, and points should be used wherever possible. A clean answer sheet helps the examiner understand answers easily.

Examinations can be faced successfully with the right attitude and proper preparation. Honesty, positive thinking, confidence, and calmness help students perform their best. Good habits like proper sleep, smart revision, time management, and neat presentation reduce fear and stress. If students follow these simple steps sincerely, they can face exams with confidence and achieve success.

**Contact: 9422716677**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Solve the arithmetic problem on the left and find the answer to the problem hidden in the numbers on the right.**




| | |
|---|---|
| 92+5= | 100162 |
| 4+33= | 1201521 |
| 83-21= | 59297 |
| 36+1= | 201110 |
| 22-10= | 343710 |
| 21-11= | 737650 |



**Help him to find the tresure.**





# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

**हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.**





**सूचना**

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.
२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ मार्च २०२६.
३) कोड्याचे उत्तर एप्रिल २०२६ च्या अंकात प्रसिद्ध होईल. ४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.02.2026, Date of Posting- 27th & 28th February 2026 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/ 2024-2026)




ऑनलाईन
वर्गणीकरिता
सोबतचा क्यूआर
कोड स्कॅन करा.
व अधिक
माहितीसाठी
९४२३००५०८९
या क्रमांकावर
संपर्क करा.

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,